RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

आमच्याकडे सर्व प्रकारचे कॉम्प्युटर, नायलॉन रबरी शिक्के एका तासात तयार करून मिळतील

■ संपर्क ■

जडे ऑफसेट प्रिंटर्स



मित्र नगर, लातूर, फोन : २४२६०८

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

LATUR लातूर | वर्ष ३४ वे | अंक १६८ वा सोमवार, दिनांक २२ सप्टेंबर २०२५ (सांज. दैनिक) | पोस्ट परवाना नं. L2/RNP/OMD-52/24-26 | पृष्ठे – ६ | मो:९४२२४७२५०२ | किंमत १ रुपया

# सोमवारपासून चीज, साबण, शाम्पू, कार आणि एसी स्वस्त

## नवीन जीएसटी दर लागू झाले

नवी दिल्ली/वृत्तसंस्था : २२ सप्टेंबरपासून, तूप, चीज, कार आणि अगदी एअर कंडिशनरपासून सर्वकाही स्वस्त झाले आहे. सरकारने ३ सप्टेंबर रोजी जीएसटी कपात जाहीर केली, ती आजपासून लागू झाली.

जीएसटी आता फक्त दोन स्लॅबमध्ये आकारला जाईल: ५% आणि १८%. कर प्रणाली सोपी करण्यासाठी सरकारने हे केले आहे. जीएसटी कौन्सिलच्या ५६ व्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

दैनंदिन वापरातील प्रत्येक वस्तू किती स्वस्त झाली आहे हे पाहण्यासाठी ग्राफिक्स पाहा. काही कंपन्यांनी नवीन दर जाहीर केलेले नाहीत, म्हणून त्यांचे अंदाजे एमआरपी दिले आहेत.

यामध्ये कंपन्या आणि विक्रेत्यांकडून दिल्या जाणाऱ्या सवलतींचा समावेश नाही. त्यामुळे बाजारात उपलब्ध असलेल्या वस्तूंच्या किमती आणखी कमी असू शकतात.

**हॉटेल बुकिंग, जिम, विमान तिकिटे, सिनेमा तिकिटेही स्वस्त होणार**

हॉटेल रूम बुकिंग, सौंदर्य आणि आरोग्य सेवांवरील जीएसटी १८% वरून ५% पर्यंत कमी करण्यात




आला आहे. १०० रुपयांपर्यंतच्या सिनेमा तिकिटांवर ५% कर आकारला जाईल, जो पूर्वी १२% होता. १०० रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या तिकिटांवर आता १८% कर आकारला जाईल.

१,००० रुपयांपेक्षा कमी भाडे असलेल्या हॉटेल खोल्या अजूनही करमुक्त राहतील. १००० ते ७५०० रुपयांच्या हॉटेल खोल्यांवर जीएसटी १२% वरून ५% करण्यात आला आहे. ७,५०० रुपयांपेक्षा जास्त भाडे असलेल्या प्रीमियम हॉटेल्सवर १८% जीएसटी आकारला जाईल.

जीएसटी बदलांमुळे काही वस्तू महाग होतील

पान मसाला आणि तंबाखूसारख्या उत्पादनांसह छंद आणि चैनीच्या वस्तूंसाठी ४०% चा नवीन स्लॅब तयार करण्यात आला आहे.

याशिवाय, काही कार आणि बाईकवरही ४०% कर आकारला जाईल. तथापि, ही वाहने अधिक महाग होणार नाहीत. पूर्वी, त्यांच्यावर २८% जीएसटी आणि १७% उपकर आकारला जात होता. याचा अर्थ एकूण कर ४५% होता, जो आता ४०% पर्यंत कमी करण्यात आला आहे. १२०० सीसी आणि ४ मीटरपेक्षा जास्त लांबीच्या पेट्रोल वाहनांवर ४०% कर आकारला जाईल.

१५०० सीसी आणि ४ मीटरपेक्षा जास्त लांबीच्या डिझेल वाहनांवरही ४०% कर आकारला जाईल.

३५० सीसी पेक्षा जास्त विस्थापन असलेल्या मोटारसायकलींवरही हा कर लागू होईल.

**जीएसटीचा अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होईल?**

सरकारचा दावा आहे की जीएसटी २.० मुळे सामान्य माणसाला दिलासा मिळेल, व्यवसाय सुलभ होईल आणि अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

१७ सप्टेंबर रोजी विशाखापट्टणम येथे झालेल्या 'नेक्स्ट जेन जीएसटी रिफॉर्म्स' कार्यक्रमात बोलताना अर्थमंत्री निर्मला सीतारमण म्हणाल्या की यामुळे अर्थव्यवस्थेत सुमारे २ लाख कोटी रुपये येतील.

मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन म्हणाले, लोकांची क्रयशक्ती अधिक असेल, ज्यामुळे मागणी-उत्पादन चक्र सुरू होईल. जीडीपी वाढ वाढेल.

अर्थतज्ज्ञ आणि एलारा कॅपिटलच्या ईव्हीपी गरिमा कपूर म्हणाल्या, या सुधारणांमुळे उपभोग मागणीत १%-१.२% वाढ होईल, ज्यामुळे पुढील ४-६ तिमाहीत जीडीपी वाढेल.

# मराठवाड्यात पावसाचा हाहाकार

## ओढे-नद्यांना पूर, शेती पाण्याखाली; घरांमध्ये शिरले पाणी, अनेक गावांचा संपर्क तुटला; लोक पुरात अडकले!

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** राज्यात सर्वदूर पावसाचा हाहाकार सुरू असून, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्राला ढगफुटीसदृश्य पावसाने अक्षरशः झोडपून काढले आहे. या अवेळी आलेल्या पावसाने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेले पीक हिरावून घेतले असून, शेतीतलाव, ओढे, नद्यांना पूर आल्याने अनेक गावांमध्ये पाणी शिरले आहे. लातूर, बीड, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली या जिल्ह्यांना पावसाचा मोठा तडाखा बसला आहे. अनेक ठिकाणी रस्त्यांना नदीचे स्वरूप आले आहे. अनेक गावांचा संपर्क तुटला आहे.

**परभणी, लातूर, जालन्यात शेतकरी संकटात**

परभणी जिल्ह्यात रविवारी रात्री झालेल्या वादळी पावसाने पारंपरिक आणि नगदी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. लातूरमध्ये मध्यरात्रीपासून सुरू असलेल्या धुवांधार पावसामुळे सर्वत्र पाणीच पाणी झाले आहे. भेटा-आंदोरा गावाचा संपर्क तुटला असून, रात्रभर झालेल्या अतिवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. जालन्यात नद्या-नाले ओसंडून वाहत असून शेती पाण्याखाली बुडाली आहे. अनेकांच्या घरात पाणी शिरले आहे आणि अंबड तालुक्यातील अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. विश्रांती घेतलेल्या पावसाने रविवारी मध्यरात्री बीड जिल्ह्याला पुन्हा एकदा झोडपून काढले. शिरूर कासारमध्ये मुसळधार पावसामुळे सिंदफणा नदीला पूर आला असून, नदीचे पाणी बाजारपेठा आणि घरांमध्ये शिरले आहे. प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे. शिरूर येथील सिंदफणा नदीने रौद्ररूप धारण केल्यामुळे अनेक घरे आणि दुकाने पाण्याखाली गेली आहेत. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

माजलगाव धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस झाल्याने धरणातून सिंदफणा नदीत मोठा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. धरणाचे ११ दरवाजे उघडण्यात आले असून, ६२,००० क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. पाण्याची आवक पाहता विसर्ग कमी-जास्त केला जाऊ शकतो, अशी माहिती प्रशासनाने दिली आहे.

धाराशिव जिल्ह्यातील भूम आणि परांडा तालुक्यात पावसाने हाहाकार माजवला आहे. चांदणी नदीला आलेल्या पुरामुळे चावडी शाळा आणि अनेक घरांमध्ये पाणी साचले आहे. यामुळे जीवनावश्यक वस्तूंचे मोठे नुकसान झाले आहे. परंडा तालुक्यातील शिरसाव येथे नदीला आलेल्या महापुरामुळे जवळपास २०० ते ३०० लोक अडकले असून, त्यांना बाहेर काढण्यासाठी मदतकार्य सुरू आहे. शेतकऱ्यांनी तात्काळ उपाययोजनांची मागणी केली आहे.जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यात रविवारी मध्यरात्री झालेल्या पावसामुळे मागणी नदीला पूर आला असून, नालवाडी शिवारातील साठवण तलाव भरून वाहत आहे, त्यामुळे गावात पाणी शिरले आहे. तसेच, रेनापुरी, दयाळा, भांबेरी या गावांचा संपर्क तुटला आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातही पहाटेपासून जोरदार पाऊस सुरू आहे. कन्नड तालुक्यात वाकी नदीला पुन्हा पूर आला आहे. पैठण शहरात देखील कहारवाडासह अनेक भागातील घरात पाणी शिरले. तर जायकवाडी, राहुलनगर येथील ५० घरात पाणी शिरल्याने नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. मागील आठ दिवसांत पैठण तालुक्यात सतत धार पावसाची सुरू आहे, यामुळे शेती अद्याप पाण्याखाली असतानाच सोमवारी पहाटे पासून मुसळधार पाऊस सुरू झाल्याने जायकवाडी, राहुलनगर या भागातील अनेक घरात गुढ्यापर्यंत पाणी साचले आहे, या ठिकाणी प्रशासनाने चार दिवसांपूर्वी पाहणी केली. मात्र कोणत्याही उपाययोजना केल्या नसल्याने आज सुरू असलेल्या पावसाने पुन्हा अनेक घरात पाणी शिरले आहे.

# लोखंडी कोयता व छऱ्याची बंदूक घेऊन दहशत, भीती पसरविणाऱ्याला गांधी चौक पोलिसांनी केली अटक

**लातूर/प्रतिनिधी :** दिनांक २१ रोजी पोलीस स्टेशन गांधी चौक हद्दी लोखंडी कोयता व छऱ्याची बंदूक घेऊन दहशत,भीती पसरविणाऱ्याला गांधी चौक पोलिसांनी अटक केली आहे. या बाबत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, लातूर बसस्थानक व गंजगोलाई परिसरामध्ये एक तरुण लाल रंगाच्या मोटार सायकल वर बंदूक आणि लोखंडी कोयता घेऊन सार्वजनिक ठिकाणी दहशत माजवत आहे अशी माहिती मिळताच वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक सुनील रेजीतवाड पोलीस स्टेशन गांधी चौक लातूर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस स्टेशन




गांधी चौक चे पोलीस अधिकारी व अंमलदार तात्काळ सदर ठिकाणी पोहोचून एका तरुणाला ताब्यात घेतले. त्याच्याकडे एक छऱ्याची बंदूक व एक लोखंडी कोयता मिळाले.सदरील तरुणाचे नाव फारूक इब्राहिम शेख, वय ३६ वर्ष, राहणार वीरहनुमंतवाडी, कव्वा नाका, असे आहे सदर तरुणाने त्याच्या जवळील यामाहा R-15 या मोसावर बसून हातात छऱ्याची बंदूक व कमरेला असलेला लोखंडी धारदार कोयता बाळगून घेऊन सार्वजनिक ठिकाणी दहशत माजवत असताना मिळून आल्याने पोलीस ठाणे गांधी चौक लातूर येथे गुन्हा नंबर ४३२/२५ कलम २७० बीएनएस ४,५ आर्मएक्ट, १३५ बीपी एक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरील कामगिरी पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक श्री मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी (लातूर शहर) समीरसिंह साळवे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे गांधी चौकचे पोलिस निरीक्षक सुनिल रेजितवाड यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक गणेश चित्ते,अमर केंद्रे, निखिल पवार, पोलिस अंमलदार रवीसन जाधव, संतोष गिरी,सचिन चंद्रपाटले,शिवा भाडुळे, बेंबडे यांनी केली आहे.

## स्वच्छता ही सेवा पंधरवड्यानिमित्त कर्मचाऱ्यांना सुरक्षा किटचे वाटप

**लातूर/प्रतिनिधी :** स्वच्छता ही सेवा पंधरवाड्या निमित्त लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने स्वच्छता कर्मचाऱ्यांना सुरक्षा किटचे वाटप करण्यात आले. राज्य शासनाच्या निर्देशानुसार मनपाच्या वतीने दि.१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत ' स्वच्छता ही सेवा' पंधरवाडा राबविण्यात येत आहे. या अंतर्गत पालिकेच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात कार्यालयाची स्वच्छता जनजागृती रॅली, हरित महोत्सव, प्लास्टिक बंदी जनजागृती रॅली, श्रमदान, स्वच्छते संदर्भात रांगोळी स्पर्धा, सायकल स्पर्धा आदींचा समावेश आहे. यासाठी पथक प्रमुख तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. स्वच्छता ही सेवा पंधरवाडा राबविताना कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांच्या आदेशानुसार उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांच्या मार्गदर्शनात स्वच्छता कर्मचाऱ्यांना सफाई मित्र या उपक्रमांतर्गत सुरक्षा कीट वाटप करण्यात आले.यात गमबूट, मास्क,हँडग्लोज आदींचा समावेश आहे. या कार्यक्रमास मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख,स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे, मुख्य स्वच्छता निरीक्षक धोंडीबा सोनवणे,भांडारपाल बालाजी शिंदे यांच्यासह स्वच्छता निरीक्षक, मुकादम आणि कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



नवरात्र उत्सव!! तुळजापूर मंदिर परिसरात AI प्रणालीच्या आधारे गर्दीचे नियंत्रण...




लातूर जिल्ह्यासाठी रेल्वेने पाणी मागवावे लागले ! त्या जिल्ह्यात पावसाने सरासरी ओलांडली आहे ! निसर्गाची किमया पाहून त्याचा ऱ्हास थांबविण्याची गरज आहे !!

# शेतकऱ्यांच्या विहिरीवरील पाणबुडी मोटारी चोरणाऱ्या २ आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेकडून अटक, १६ मोटारी व रोख रक्कम जप्त

**लातूर/प्रतिनिधी :** शेतकऱ्यांनी त्यांच्या विहिरीमधील पाणबुडी मोटारी चोरीला जात असल्याच्या घटना मागील काही दिवसापासून घडत होत्या.

शेतकऱ्यांच्या विहिरीवरील पाणबुडी मोटारी चोरीला जात असल्याने शेतकऱ्यांना पिकांना पाणी देण्यासाठी मोठ्या संकटांना तोंड द्यावे लागत होते. तसेच शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान सुद्धा होत होते. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी शेतकऱ्यांच्या शेतातून चोरीला गेलेली वेगवेगळी शेती अवजारे संदर्भातील गुन्ह्यांच्या छडा लावण्याचे मार्गदर्शन करून सूचना केल्या होत्या.

त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अमलदारांचे पथक तयार करण्यात आले होते. शेतकऱ्यांच्या शेतातील चोरीला गेलेल्या,पोलीस ठाणेला दाखल असलेल्या गुन्ह्यांचा डेटा एकत्र करून त्याच्या सखोल विश्लेषण करून मिळालेल्या माहितीवरून शेतातील पाणबुडी मोटार चोरणाऱ्या संशयित आरोपींचा शोध घेण्यात येत होता. दरम्यान दिनांक १७ सप्टेंबर रोजी पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारावर पाणबुडी चोरीतील संशयित गुन्हेगारांना मुरुड बसस्थानक परिसरातून ताब्यात घेण्यात आले. त्यांचे नाव कुंदन गजेंद्र काळे, वय २७ वर्ष, राहणार ढोकी तालुका जिल्हा धाराशिव. शुभम दशरथ बनसोडे, वय २० वर्ष, राहणार मंगरूळ तालुका कळंब जिल्हा धाराशिव. असे असून त्यांनी त्याच्या इतर साथीदारासह मिळून लातूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शेतामधून पाणबुडी मोटारी चोरल्याचे कबूल केले. त्यांच्याकडे अधिक तपास करता नमूदांनी चोरी केलेल्या पाणबुडी मोटारी ह्या बोरगाव ते शिराळा जाणाऱ्या रोडवरील एका बारच्या जवळील कचरा फेकण्यात येणाऱ्या ठिकाणी खड्डा करून पुरून ठेवले होते त्या १६ पाणबुडी



मोटारी तसेच काही पाणबुडी मोटारी विकून मिळवलेली रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. जप्त करण्यात आलेल्या पाणबुडी मोटारी वरून पोलीस ठाणे लातूर ग्रामीण, रेनापुर, मुरुड, औसा, गातेगाव, भादा येथे दाखल असलेल्या गुन्ह्यातील एकूण १६ पाणबुडी मोटारी तसेच रोख रक्कम असा एकूण दोन लाख २९ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून पाणबुडी मोटारीचे ०८ गुन्हे उघड झाले आहेत.

पुढील तपास कामी पोलीस ठाणे लातूर ग्रामीण पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले असून सदरच्या आरोपीकडून पाणबुडी मोटारी तसेच शेती अवजार चोरीचे आणखीन गुन्हे उघडकिस येण्याची शक्यता आहे. तसेच त्यांच्या इतर साथीदारांचा पथकाकडून शोध घेण्यात येत असून त्यांना लवकरच नमूद गुन्ह्यात अटक करण्यात येणार आहे.

जप्त केलेल्या पाणबुडी मोटारी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून लवकरात लवकर पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या हस्ते संबंधित शेतकऱ्यांना परत देण्यात येणार आहेत.

सदरची कारवाई वरिष्ठाचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ, पोलीस अंमलदार संजय कांबळे, तुराब पठाण, राजेश कंचे, सूर्यकांत कलमे, नवनाथ हासबे, माधव बिलापट्टे, मोहन सुरवसे, पाराजी पुठ्ठेवाड, तुळशीराम बरुरे, गणेश साठे, महादेव शिंदे, गोविंद भोसले, जांभळे शैलेश सुडे, महिला पोलीस अंमलदार अंजली गायकवाड यांनी केली आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका!

आगामी नुतन वर्षात पहिल्याच महिण्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका पार पडणार आहेत. अनेक दिवसापासून जिल्हा परिषद व महानगरपालिकेच्या निवडणुका नसल्याने प्रशासकिय राज चालू आहे. ठराविक काळापर्यंत प्रशासकिय व्यवस्था चांगली असते. दिर्घ काळ असेल तर नाराजीचा सुर जनतेत निर्माण होतो. आता न्यायालयाने लवकर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका घ्या असे सांगितले असल्याने आता जानेवारी किंवा फेब्रुवारीत निवडणुका होतील असा अंदाज आहे. या अंदाजानुसार सर्वच राजकिय पक्ष आता कमाला लागले आहेत असेच चित्र दिसून येते. राज्यात तसे पाहिले तर एक बाब लक्षात येते महाविकास आघाडी म्हणजें इंडिया आघाडी व महायुतीत लढत होणार आहे. सध्याला भाजपाला अनेक अपेक्षा आहेत. भाजपाला कोणत्याही परिस्थितीत मुंबई महानगरपालिका जिंकायाची आहे. याची तयारी अनेक दिवसापासून सुरू आहे. मुंबई देशातील प्रमुख आर्थिकदृष्ट्या सक्षम अशी महानगरपालिका आहे. अशा महानगर पालिका आपल्याच ताब्यात राहावी अशी अपेक्षा सर्वांना आसने अपेक्षित आहे. त्यानुसार जे काही मुंबईत सर्वच राजकिय पक्ष आहेत ते प्रयत्न करीत आहेत. मुंबईत तसे पाहिले तर शिवसेनेचे वर्चस्व कायम होते. हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेने व मराठी माणसाच्या रक्षणासाठी जे प्रयत्न केले ते विसरता येऊ शकत नाही. आजही मराठी माणूस मुंबईत शिवसेनेच्या पाठीशी उभा राहात आला. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जाण्याने मोठे मराठी माणसाचे नुसकसान झाले आहे. मुबईत मराठी माणसाबरोबर गुजराती समाज मोठ्याप्रमाणात दिसून येतो. गुजराती बांधव हे पक्के व्यापारी असतात. ते धंद्यामुळे आले व स्थायीक झाले आहेत. तसेच कामाच्या शोधात युपी व बिहारी मंडळी मोठ्या प्रमाणात मुंबईत आली व स्थायिक झाली आहे. त्यामुळे मराठी माणसाचे वर्चस्व कमी होत गेले. त्यात हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब जाण्याची मोठी हानी झाली. त्यानंतर शिवसेनेत फुट पडत गेली. एकप्रकारे शिवसेना एकत्र ठेवण्यात उद्धजींना तेवढे जमले नाही. उद्धवजी यांनी काँग्रेस व राष्ट्रवादी शरद पवार यांच्यासोबत गेल्याने जो कट्टर शिवसैनिक नाराज झाला. त्यामुळे एकनाथ शिंदे हे बाजूला झाले व नवीन चुल तयार केली. याचा पुरेपूर फायदा भाजपाने उचलला. दोघे मिळून सत्ता चालवली. एकदा का भाजपाने सत्ता हाती घेतली तर ते सहसा सोडत नाहीत. तशाच प्रकार घडला. पहिल्या टर्ममध्ये एकनाथ शिंदे मुख्यमंत्री बनले. दुसऱ्यावेळी भाजपाने आपल्याकडे देवेंद्र फडवणीस यांच्या माध्यमातून मुख्यमंत्रीपद हस्तगत केले. त्यामुळे त्यांना वरचेवर यश मिळत गेले. केंद्रात भक्कम असे भाजपाचे सरकार असल्याचा लाभ राज्यात भाजपाला होत गेला. भाजपाला आता राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थेत सत्ता हवी आहे. पुर्वी अनेक स्वराज्य संस्थेत विरोधक म्हणजे काँग्रेस व शरद पवार यांचे वर्चस्व होते. त्यामुळे पुन्हा भाजपा विरोधात काँग्रेस, शरद पवार यांच्यागटात लढत होणार आहे. कोणत्याही परिस्थिती काँग्रेस व शरद पवार आपल्याकडे स्थानिकस्वराज्य संस्था राहाव्यात याचा विचार करणार, त्यामुळे भाजपाला मोठा शह देण्यात येणार आहे यात शंका देखील घेण्याचे कारण नाही. भाजपा मोठ्या तयारीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकी उतरणार आहे. असे जरी असले तरी ग्रामीण भागात भाजपाचे कार्यकर्ते किंवा मतदार हा कमी आहे. पुर्वीपासून काँग्रेसची सत्ता असल्याने ग्रामपंचायतपासून ते शिक्षणसम्राट, सहकार सम्राट बनले आहेत. आता कोठे भाजपाच्या हाती शिक्षण संस्था व साखर कारखाने लागत आहेत. जे बंद पडलेले साखर कारखाने जे पुर्वीचे काँग्रेसचे होते ते चालविण्यासाठी भाजपाचे कार्यकर्ते, नेते मंडळी घेत आहे. भाजपाला स्थानिक स्वराज्य संस्थेत मोठे कष्ठ घ्यावे लागणार आहेत. सहज स्थानिक स्वराज्य संस्था ताब्यात येतील असे वाटत असेल तर ते शक्य नाही. निवडणुका जाहीर होण्या अगोदरच काँग्रेस तयारीला लागले आहे. निवडणुकीतील आरक्षण जाहिर झाले. कोणात्या वर्गाला अध्यक्षपद जाहिर झाल्याचे समजताच काँग्रेस कामाला लागली आहे. शरद पवार यांचे वर्चस्व पश्चिम महाराष्ट्रात अधिक असले तरी आता या भागातील सत्तेत अजित पवार सहभागी झाले आहे. सत्तेत वाट अजित पवारांचा दिसून येत आहे. यावेळी काँग्रेसला चांगले दिवस येतील असा अंदाज आहे. अजूनही काँग्रेसने ग्रामीण भागातील अर्थकरण टिकून ठेवले आहे. ग्रामपंचायत, सहकारी सोसायट्या सह बाजार समिती काँग्रेसकडे आहेत. त्याच बरोबर सहकारी बँका, साखरकारखाने आहेत. त्यामुळे काँग्रेसला अधिक मेहनत घेतली तर काही स्थानिक स्वराज्य संस्थेत चांगले यश मिळू शकेल. राज्यातील सत्तेत तिघांचा वाटा आहे. त्यामुळे प्रत्येक जन स्वतंत्र लढणार का महायुतीत लढणार हे अजून जाहीर झाले नाही. त्यामुळे भाजपाचे मित्र पक्ष एकनाथ शिंदे यांची शिवसेना व अजित पवार यांची राष्ट्रवादी मिळून लढणार हे जाहिर होणे बाकी आहे. त्याच प्रमाणे पुणे, मुंबई, छत्रपतीसंभाजीनगर, नागपूर, नाशीक असे मोठ्या स्थानिक स्वराज्य संस्था आहेत या बाबत सर्वांचे एकमत होणे अजून बाकी आहे. तयारी तर सर्वपक्षातून होताना दिसून येत आहे. काही झाले तरी स्थानिक स्वराज्य संस्थेत भाजपाला मोठे मिळाले तर आगामी काळात भाजपाला मोठे यश मिळू शकेल. मुंबईतील राजकारणाचा अंदाज येत नाही. ठाकरे बंधू एकत्र येणार असेच बोलले जात आहेत. ठाकरे बंधु एकत्र आले तरी इतर समाज जो गुजराती, बिहारी किंवा युपीचा आहे तो कोणाकडे झुकला जाणार यावरच बरेच सत्तेबाबत आवलंबुन आहे. मुळात मुंबई महानगरपालिका जर भाजपाकडे आली तर इतर पक्ष संपल्यासारखे होवू शकतात. त्याच प्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थेत ही ग्रामीण भागातील मतदार अधिक असतात. ज्या पक्षाकडे ग्रामीण भाग असतो त्याच पक्षाला चांगले दिवस येतात त्यामुळे आता सर्व पक्षाचे लक्ष हे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीकडे असणार आहे. ही एक राजकिय पक्षासाठी मोठी परिक्षाच आहे.

# स्वातंत्र्यसैनिकांनी मराठवाडा मुक्तीसाठी चळवळ उभा केली - सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील

**देवर्जन/प्रतिनिधी :** मराठवाड्यातील स्वातंत्र्य सैनिकांनी मराठवाडा मुक्तीसाठी चळवळ उभा केली म्हणूनच आपण आज स्वातंत्र्य पाहत आहोत असे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री तथा गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी देवर्जंन तालुका उदगीर येथे केले.

देवर्जन तालुका उदगीर येथे स्वातंत्र सैनिक गंगाधरराव पाटील साकोळकर यांच्या व्यक्ती व कार्य या मराठी व इंग्रजी ग्रंथाचा प्रकाशन सोहळा राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न झाला यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राज्याचे माजी क्रीडा व युवक कल्याण मंत्री दिलीपराव देशमुख उपस्थित होते.

यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री बाळासाहेब जाधव , खासदार शिवाजीराव काळगे, आमदार तथा माजी मंत्री संजय बनसोडे, राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील सेलुकर, माजी प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, माजी आ.मनोहरराव पटवारी, मारोती महाराज साखर कारखान्याचे चेअरमन श्यामराव भोसले, लातूर






जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माजी चेअरमन शिलाताई पाटील, माजी संचालक संभाजीराव सुळे, श्रीमती अर्चनाताई पाटील, ज्येष्ठ विधीज्ञ अ‍ॅड. विशंभरराव गुणाले, माजी महापौर अ‍ॅड. दिपकराव सुळ, शिवाजीराव साकोळकर, सगरे सर, विठ्ठलराव पाटील, डी.आर मुकदम, सचिन दाताळ, धनाजी मुळे पाटील, शिवाजीराव मुळे, माजी आमदार धर्माजी सोनकवडे, प्रितीताई भोसले, मन्मथआप्पा किडे, शिवाजीराव हुडे, गुरुनाथ बेळे, बालाजीराव भोसले, मुन्ना पाटील, कल्याणराव पाटील, श्रीकांत पाटील, शिवाजीराव साकोळकर, अ‍ॅड. विजय साकोळकर, प्रा. ओमप्रकाश साकोळकर सह आदी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील म्हणाले की, देवर्जन हे गाव स्वातंत्र सैनिकांचे असून,या गावाने मराठवाड्यासाठी मोठ्या प्रमाणात बलिदान दिले आहे. आज आपण जे सोनेरी दिवस पाहतो ते फक्त स्वातंत्र्य सैनिकांमुळेच पहात आहोत. देशाचा विकास करायचा असेल तर खेड्याचा विकास करणे आवश्यक्य असून, त्या दृष्टीने सर्वांनी एकत्रितपणे काम करणे गरजेचे असल्याचे सहकार मंत्री नामदार पाटील म्हणाले.

तसेच राज्याच्या अनेक नेत्यांनी सहकाराकडे लक्ष दिले आता त्यांचाच वारसा चालवण्याची संधी मला असून मी सुद्धा मराठवाडा आणि विदर्भाकडे सहकार कसे वाढेल याकडे लक्ष देणार आहे. सोसायटीची संगणीकरण प्राधान्यने करून सहकार चळवळ रुजवण्यासाठी मी प्रयत्न करणार असल्याचे ना. पाटील म्हणाले.

यावेळी अर्चनाताई पाटील चाकूरकर, खासदार डॉक्टर शिवाजी काळगे, आमदार संजय बनसोडे यांनी मनोगते व्यक्त केली तर कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप राज्याचे माजी क्रीडा व युवक कल्याण मंत्री दिलीपराव देशमुख यांनी केला.

# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान अंतर्गत विभागीय रेल्वे रुग्णालयात महिला कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे केले आयोजन





**सोलापूर/प्रतिनिधी :**
मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने १८ सप्टेंबर २०२५ रोजी सोलापूर येथील डॉ. कोटनीस मेमोरियल डिव्हिजनल रेल्वे हॉस्पिटल (डीआरएच) येथे स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान अंतर्गत महिला कर्मचाऱ्यांसाठी एक विशेष आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले होते, ज्याचा उद्देश कुटुंबांचे कल्याण आणि सक्षमीकरण सुनिश्चित करण्यात महिलांच्या आरोग्याची महत्त्वाची भूमिका अधोरेखित करणे हा होता.

या शिबिरात महिलांसाठी विशेष आरोग्य तपासणी सेवा देण्यात आल्या, ज्यामध्ये हिमोग्लोबिन चाचणी, रक्तदाब तपासणी आणि समुपदेशन सत्रांचा समावेश होता. कार्यक्रमादरम्यान एकूण ५३ लाभार्थ्यांनी आरोग्य सेवांचा लाभ घेतला. वैद्यकीय पथकाने सहभागींना विविध आरोग्य परिस्थितींबद्दल ओळख पटवून त्यांचे समुपदेशन केले. जागरूकता मोहिमेचा एक भाग म्हणून, आरोग्यविषयक महत्त्वाच्या विषयांवर व्याख्याने देण्यात आली ज्यात खालील गोष्टींचा समावेश होता:

- माता आणि बाल आरोग्य
- पोषण आणि जीवनशैली व्यवस्थापन
- मासिक पाळी स्वच्छता
- अशक्तपणा प्रतिबंध

या उपक्रमामुळे केवळ वेळेवर निदान आणि मार्गदर्शन मिळाले नाही तर प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी एक व्यासपीठ देखील तयार झाले, ज्यामुळे महिला सक्षमीकरण आणि कुटुंब कल्याणात योगदान मिळाले.

शिबिराचे उद्घाटन मुख्य वैद्यकीय अधीक्षक, डीआरएच, सोलापूर डॉ. मंजुनाथ जी. एस, सहाय्यक मुख्य वैद्यकीय अधीक्षक, डीआरएच डॉ. कृष्णा आर. चंडक यांच्या उपस्थितीत करण्यात आले. सहभागींना संबोधित करताना, डॉ. कृष्णा आर. चंडक यांनी उपक्रमाचा मुख्य संदेश दिला, महिलांचे आरोग्य हे एका मजबूत समाजाचा कणा आहे यावर भर दिला.

स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान अंतर्गत हा प्रयत्न सोलापूर विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्य आणि कल्याणासाठी सतत वचनबद्धतेचे प्रतिबिंबित करतो, जो भारतीय रेल्वेच्या निरोगी आणि सक्षम कार्यबल निर्माण करण्याच्या व्यापक दृष्टिकोनाशी सुसंगत आहे.

## लातूर जिल्हा सॉफ्टबॉल संघटनेतर्फे राष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार

**लातूर/प्रतिनिधी :**गाजियाबाद येथे दिनांक ११ ते १४ सप्टेंबर २०२५ दरम्यान पार पडलेल्या १५ व्या सॉफ्टबॉल फेडरेशन कप चॅम्पिअनशिप स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलांच्या संघाने रजत पदक तर मुलींच्या संघाने कांस्य पदक जिंकून महाराष्ट्राचा मान उंचावला. या यशामध्ये लातूर जिल्हा सॉफ्टबॉल असोसिएशनचे खेळाडू कुमार व्यंकटेश झिपरे व कुमारी साधना पवार यांनी मोलाचा वाटा उचलला.या घवघवीत यशाबद्दल लातूर जिल्हा सॉफ्टबॉल संघटनेचे अध्यक्ष श्री. मोईजभाई शेख, उपाध्यक्ष सौ. आशाताई भिसे, दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व कोषाध्यक्ष श्री. लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव श्री. रमेश बियाणी, सदस्य श्री. दत्ता लोखंडे, श्री. विशाल अग्रवाल, श्री. विलास जाधव, डॉ. अनिरुद्ध बिराजदार तसेच संघटनेचे सर्व पदाधिकारी यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.याप्रसंगी शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त श्री. मोईजभाई शेख म्हणाले की, ‘‘लातूरच्या मातीतून असेच उत्कृष्ट खेळाडू घडावेत व भारतीय संघात त्यांचा समावेश व्हावा यासाठी शक्य ती मदत केली जाईल. महाराष्ट्र राज्य सॉफ्टबॉल संघटनेचे अध्यक्ष, सचिव व पदाधिकाऱ्यांच्या सहकार्यामुळे लातूरचे खेळाडू महाराष्ट्रापुरतेच नाही तर राष्ट्रीय स्तरावरही आपली छाप पाडत आहेत.’’ दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव श्री. रमेश बियाणी यांनी आपल्या मनोगतात प्रतिपादन केले की, ‘‘दयानंद शिक्षण संस्थेचे मैदान खो-खो, कबड्डी यांसारख्या पारंपरिक खेळांसाठी सदैव उपलब्ध राहिले आहे. विद्यार्थ्यांनी पारंपरिक खेळाबरोबर आधुनिक खेळावर भर देऊन क्रीडा कौशल्यांचा विकास करून घ्यावा.’’ दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व कोषाध्यक्ष श्री. लक्ष्मीरमण लाहोटी म्हणाले की, ‘‘दयानंद शिक्षण संस्था नेहमीच क्रीडा व शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत आली आहे. व्यंकटेश झिपरे व साधना पवार यांनी राज्याचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांच्यासारखे खेळाडू लातूर जिल्ह्याच्या भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरतील.’’

## ‘समुद्र माझा, मी समुद्राचा’! जागतिक समुद्र किनारा स्वच्छता दिनानिमित्त वर्सोवा किनाऱ्यावर स्वच्छता अभियान

**मुंबई/प्रतिनिधी :** जागतिक समुद्र किनारा स्वच्छता दिनाचे औचित्य साधत आज राज्यभरात स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या विविध उपक्रमांना सुरुवात झाली आहे. त्याचाच एक भाग म्हणून वर्सोवा-वेसावे समुद्र किनाऱ्यावर मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात ’समुद्र माझा, मी समुद्राचा’ हे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या उपक्रमात मत्स्यव्यवसाय विभाग आणि सागरी सीमा मंच यांच्या माध्यमातून व्यापक सहभाग नोंदविण्यात आला. विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वीच मंत्री नितेश राणे यांनी ’प्लास्टिकमुक्त कोळीवाडे’ करण्याची घोषणा केली होती. त्यानंतर आज या स्वच्छता मोहिमेत स्वत: सहभाग घेऊन त्यांनी किनाऱ्यावरील कचरा गोळा केला आणि स्थानिकांना प्लास्टिकविरोधी जनजागृती केली.

## दयानंद वाणिज्य मध्ये ‘अविष्कार रिसर्च फेस्टिवल’ साठी एक दिवसीय कार्यशाळा संपन्न

**लातूर/प्रतिनिधी**: येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील इन्क्युबॅशन अँड इनोव्हेशन, अविष्कार सेलच्या माध्यमातून अविष्कार रिसर्च फेस्टिवल या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अविष्कार रिसर्च फेस्टिवल या स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन या कार्यशाळेच्या माध्यमातून किशोर जेवे यांनी केले. अविष्कार रिसर्च फेस्टिवल या संशोधन स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी विषय कसा निवडावा, विषयाची मांडणी कशी करावी व त्यानुसार आपले संशोधन कसे करावे ते प्रभावीपणेसादर कसे करावे व तसेच विद्यार्थ्यांमध्ये संशोधनात्मक वृत्ती जागृत व्हावी आणि जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी संशोधन क्षेत्राकडे एक संधी म्हणून पहावे यासाठी तज्ञांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना व्हावं म्हणून दयानंद वाणिज्य महाविद्यालयाने हा उपक्रम राबविला. या संदर्भात पुढे विद्यार्थ्यांना सखोल असे मार्गदर्शन करत असताना कुतूहलातूनच अविष्कार निर्माण होतो असे प्रतिपादन त्यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. प्रशांत मान्नीकर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले व तसेच याप्रसंगी होणाऱ्या अविष्कार या संशोधन स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आणि आपल्या कल्पनाशक्तीचा योग्य वापर करून विद्यार्थ्यांनी अविष्कार या स्पर्धेकडे फक्त स्पर्धा म्हणून न पाहता एक संधी म्हणून आपल्या कल्पकतेचे एक पाऊल टाकावे असे आवाहनही आपल्या अध्यक्षीय भाषणात केले.

याप्रसंगी संशोधन विभाग प्रभारी प्रा. अक्षय पवार यांनी देखील विद्यार्थ्यांना या संशोधन स्पर्धेत बद्दल असलेले नियम अटी याबद्दल यथोचित असे मार्गदर्शन केले. सदरील कार्यशाळेसाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉक्टर गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.बाळासाहेब चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. सदरील कार्यक्रमाचे आयोजन इन्क्युबॅशन अँड इनोवेशन व अविष्कार सेलच्या प्रमुख प्रा.निकिता अग्रवाल यांनी केले. त्याचबरोबर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.लता जाधव व तसेच आभार प्रा. सुहाना शेख यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.अजय चव्हाण, प्रा.ऐश्वर्या कुलकर्णी, प्रा.साक्षी पाटील, प्रा. माहेश्वरी पटणे, प्रा. प्रसाद पाटील, प्रा. क्षितिज कांबळे व कार्यालयीन कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रीय विधायक संमेलनात राजकीय पक्षांचा सुसंवाद घडवून आणला; डॉ. राहुल कराड यांचा लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या हस्ते गौरव

**लातूर/प्रतिनिधी :**लोकशाहीच्या बळकटीसाठी देशभरातील विविध राजकीय पक्षांच्या आमदारांसाठी २०२३ साली राष्ट्रीय विधायक संमेलन आयोजित करुन एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्यामध्ये सुसंवाद व विचार मंथन घडवून आणल्याबद्दल तसेच देशभरातील २४ राज्यातील १३० आमदारांना बोस्टन येथे नॅशनल कॉन्फरन्स ऑफ स्टेट लेजिस्लेटर्स २०२५ मध्ये इंटर नॅशनल कपॅसिटी एन्हान्समेंट प्रोग्राममध्ये सहभागी करण्यासाठी अत्यंत अमूल्य कार्य केल्याबद्दल एनएलसीचे संस्थापक डॉ. राहुल विश्वनाथ कराड यांचा लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.



कर्नाटक विधानसभेच्यावतीने बेंगळुरू येथे प्रथमच विधानसभेत आयोजित करण्यात आलेल्या ११ व्या कॉमनवेल्थ पार्लमेंटरी असोसिएशन (सीपीए) इंडिया रीजन कॉन्फरन्सच्या उद्घाटन समारंभात डॉ. राहुल कराड यांचा सत्कार लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश नारायण सिंह, उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार, कर्नाटक विधान परिषदेचे अध्यक्ष बसवराज होराट्टी आणि कर्नाटक विधानसभेचे सभापती यू. टी. खादर यांच्या उपस्थित झाला. तसेच देशातील राज्य विधिमंडळांचे सभापती, उपसभापती, अध्यक्ष आणि सचिव तसेच लोकसभा सचिवालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बसवराज होराट्टी म्हणाले,‘‘कायदेमंडळ लोकशाहीचे संवैधानिक रक्षक असले तरी डॉ. राहुल कराड यांनी एनएलसीचे आयोजन करुन आमदारांमध्ये संवाद वाढविला. त्यांची कार्यक्षमता वाढविणे, तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आमदारांना जोडून त्यांच्या कार्याला अर्थपूर्णपणे पूरक ठरतात. ज्या प्रमाणे सार्वजनिक खाजगी भागीदारी अनेक क्षेत्रात यशस्वी झाली आहे, त्याचप्रमाणे लोकशाहीच्या महान कार्यासाठी या क्षेत्रातही हातमिळवणी करण्यात काहीच गैर नाही.’’

डॉ. राहुल कराड म्हणाले, ‘‘कॉमनवेल्थ पार्लमेंटरी असोसिएशन (सीपीए) ने केलेल्या गौरवाबद्दल मी त्यांचे आभार मानतो एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटच्या माध्यमातून एनएलसी भारत हे भारतीय लोकप्रतिनिधींना सक्षम करणारे आणि राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर विधिमंडळीय सहकार्य, संवाद व चांगल्या कार्यपद्धतींचे आदानप्रदान घडवून आणणारे एक अग्रगण्य व्यासपीठ निर्माण करण्यात आले. देशात प्रथमच राष्ट्रीय विधायक संमेलनात १८०० आमदारांनी एकमेकातील संवादातून विचारांचे मंथन केले.

# रिकाम्यापोटी लवंग चघळून खाण्याचे अद्भुत फायदे !

सकाळी रिकाम्यापोटी लवंग चघळून खाणे शरीरासाठी खूप फायदेशीर ठरू शकते. लवंग, ज्याचा वापर स्वयंपाक घरात विविध मसाले, फोडणी किंवा चहात चव वाढवण्यासाठी केला जातो, तो आयुर्वेदात देखील अत्यंत महत्वाचा घटक मानला जातो. लवंगात असलेल्या नैसर्गिक गुणधर्मांमुळे त्याला आरोग्यवर्धक असे अनेक फायदे प्राप्त होतात. यामध्ये जीवनसत्त्वे, खनिजे, फायबर्स, अँटीऑक्सिडंट्स आणि इतर आवश्यक पोषणतत्त्वे समाविष्ट आहेत, ज्यामुळे लवंग केवळ चविष्टच नसून आरोग्यदायक देखील आहे. आयुर्वेदाच्या दृष्टीने, लवंग अनेक शारीरिक विकारांवर उपाय म्हणून वापरला जातो, तसेच हे शरीराच्या विविध कार्यक्षमतेला प्रोत्साहन देणारे असते. जरी लवंगाचा वापर सामान्यत: मसाल्यांमध्ये केला जातो, तरी त्याचे शुद्ध रूप, अर्थात त्याची कडी चघळणे, पचनतंत्र, रोगप्रतिकारक शक्ती, श्वासाची दुर्गंधी, दातदुखी, आणि यकृताच्या आरोग्यसाठी लाभकारी ठरते. त्यामुळं, लवंगाचे हे फायदे जाणून घेऊन त्याचा नियमित उपयोग अनेक आरोग्य समस्यांवर मात करण्यास मदत करू शकतो.लवंगाच्या उपयोगाचे विविध फायदे

१) रोगप्रतिकारशक्तीला बूस्ट

आयुर्वेदानुसार, लवंगात असलेले अँटीऑक्सिडंट्स आणि व्हिटॅमिन उ रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी अत्यंत प्रभावी आहेत. हे शरीराच्या पांढऱ्या रक्तपेशींच्या निर्मितीला चालना देऊन आपल्याला सर्दी, फ्लू, आणि इतर संसर्गजन्य आजारांपासून बचाव करण्यात मदत करतात.२) श्वासाची दुर्गंधी कमी करणे

लवंगाच्या अँटी-बॅक्टेरियल गुणधर्मांमुळे श्वासातील दुर्गंधी दूर होऊ शकते. लवंग चघळल्याने तोंडातील लाळचे प्रमाण वाढते आणि त्यातून बॅक्टेरियाचा नाश होतो.

३) यकृताच्या निरोगी कार्यास सहाय्य

यकृताच्या आरोग्यासाठी लवंग अत्यंत लाभकारी ठरतो. यकृताचे कार्य सुधारण्यासाठी लवंगाचे सेवन मदत करते, तसेच शरीरातील अशुद्धता आणि विषारी पदार्थ बाहेर टाकण्यास मदत करतो.४) दातदुखीला आराम

लवंगात युजेनॉल नावाचे एक घटक असतो, जो दातदुखी कमी करण्यास मदत करतो. लवंग चघळल्याने दातांचे आरोग्य सुधारते आणि दातदुखीचा त्रास कमी होतो. दातदुखीच्या स्थितीत लवंगाची काडी दाढीखाली ठेवल्याने देखील आराम मिळतो.

# पुन्हा एकदा लांबणीवर!




राज्यातील २९ महापालिका, २६ जिल्हा परिषदा, २८९ पंचायत समित्या आणि २५७ नगर पालिकांच्या निवडणुकीची प्रक्रिया येत्या चार महिन्यांत पार पाडण्याची जबाबदारी सरकार आणि निवडणूक आयोगावर राहणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांत घ्या, हा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश धुडकावणार्या राज्य निवडणूक आयोगाला न्यायालयाने चांगलेच फटकारले आहे. २०२२ पासून महापालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत. काही मुद्द्यांवरून न्यायालयीन लढाई सुरू राहिली आणि निवडणुका लांबणीवर पडत गेल्या. सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या सुनावणीतही राज्य निवडणूक आयोगाने मतदान यंत्रे अपुरी असल्याचे व शाळांच्या परीक्षा असल्याने मतदान केंद्रे उपलब्ध न होण्याची सबब पुढे केली. त्यामुळेच न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाला बागची यांच्या पीठाने राज्य निवडणूक आयोग आणि सरकारची खरडपट्टी काढली. यात निवडणूक आयोगाची निष्क्रियता आणि विलंब हे त्यांच्या अकार्यक्षमतेचे निदर्शक आहे, अशा शब्दांत न्यायालयाने सुनावले आणि यापुढे कोणतीही मुदतवाढ मिळणार नाही असेही ठणकावले. न्यायालयाच्या या आदेशामुळे आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत घ्याव्या लागणार आहेत. तब्बल चार वर्षांपेक्षा अधिक काळ महापालिकांवर प्रशासक असणे हे लोकशाहीचे द्योतक कसे मानायचे? निवडणुका न झाल्याने प्रशासकांच्या हाती कारभार हा सर्वसामान्यांच्या दृष्टीनेही गैरसोयीचाच म्हटला पाहिजे. यातून सत्तेच्या केंद्रीकरणालाच बळकटी मिळत असते. सरकारलाही तातडीने निवडणुका घेण्याची गरज वाटत नसावी. कदाचित यात त्यांची राजकीय सोयही पाहिली जात असावी. महापालिकांवर प्रशासक राज असल्याने नागरिकांच्या स्थानिक समस्यांचे निराकरण नीट होऊ शकत नाही. सरकारी अधिकारीही नागरी समस्यांबाबत जागरूक असतातच असे नाही. इतका प्रदीर्घ काळ प्रशासकांकडे महापालिकांचा कारभार असण्याचा हा पहिलाच प्रकार असावा. राज्यात तीन पक्षांचे महायुतीचे सरकार सत्तेवर आहे. महापालिका आणि जिल्हा परिषदांवर वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी या तिन्ही पक्षांत जोरदार चुरस आहे. निवडणुकीच्या निमित्ताने महायुतीलाच तडे जाण्याची शक्यता असल्याने निवडणुका लांबणीवर टाकल्या जात आहेत का या शंकेलाही त्यामुळे वाव मिळतो.

निर्णयाचे स्वागत

या आधीच्या निर्णयाचा आधार घेत सर्वोच्च न्यायालयाने आगामी चार महिन्यांत महापालिका निवडणुकांची प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश दिले. त्यानुसार ३१ ऑक्टोबरपर्यंत प्रभाग रचना आणि ३१ जानेवारी २०२६ पर्यंत निवडणुका पूर्ण करण्याचे बंधन राज्य निवडणूक आयोगावर राहणार आहे. निवडणुका थांबवण्यासाठी परीक्षा, सण, निधी किंवा कोणत्याही तांत्रिक कारणांचा आधार घेता येणार नाही, असेही सर्वोच्च न्यायालयाने बजावले आहे. खरेतर निवडणुका वेळेवर घेणे हे लोकशाहीचे मूलतत्त्व आहे. त्या लांबणीवर गेल्याने प्रतिनिधीमार्फत प्रशासन या हेतुकडेच दुर्लक्ष होते. त्यातून जनतेचा लोकशाहीवरील विश्वासही कमी होऊ शकतो. स्थानिक स्तरावरील कारभारात पारदर्शकतेचा अभाव दिसतो. स्थानिक गरजांनुसार विकास प्रकल्प राबवण्यावर मर्यादा येतात. नियुक्त केलेले प्रशासक ठराविक चौकटीतच काम करतात. त्यातून प्रतिनिधित्व आणि त्यांच्या जबाबदार्या हे दोन्ही घटक कमकुवत होतात. राज्य निवडणूक आयोगाने निवडणुका पुढे ढकलण्यासाठी सांगितलेली कारणे ही केवळ पळवाट दिसते. निवडणुकांतून नवे नेतृत्व उदयास येत असते; पण २०२२ पासून लांबत गेलेल्या निवडणुकांमुळे त्यास खीळ बसली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आधीच्या निर्णयानुसार दिवाळीनंतर निवडणुका होणे अपेक्षित होते. त्या दृष्टीने राजकीय पक्षांची मोर्चेबांधणीही सुरू झाली होती. जाहीर झालेल्या प्रभाग रचनेवरून राजकीय वादही झडले. आता निवडणुकांच्या तारखाच जाहीर होणे अपेक्षित असताना पुन्हा एकदा महापालिका निवडणुका लांबणीवर पडल्या आहेत. या संदर्भाने न्यायालयाने मुदतवाढ दिली जाणार नाही, असे बजावले आहे. न्यायालयाच्या या ठाम भूमिकेचे स्वागतच व्हायला हवे.

# इस्लामी कायद्यानुसार वक्फ म्हणजे?

इस्लामचे आचरण करणारा मुस्लिम कोण हे ठरवण्यासाठी राज्यांनी नियम निश्चित करेपर्यंत ही स्थगिती राहणार आहे. वक्फच्या जमिनींमधून नफा कमावला जात नाही, हे अल्पसंख्याकांचे म्हणणेही लक्षात घेतले पाहिजे.

संसदेने नुकत्याच संमत केलेल्या 'सुधारित वक्फ' कायद्यातील काही कलमांच्या अंमलबजावणीस सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली, तिचे स्वागत केले पाहिजे. ज्या तरतुदी किंवा कलमे वादग्रस्त ठरली होती; त्यांना स्थगिती देण्यात आली आहे. मात्र, पूर्ण सुधारित कायद्यास स्थगिती देण्यास न्यायालयाने नकार दिला आहे. एखादी मालमत्ता 'वक्फ' आहे, की नाही हे ठरवण्याचे व्यापक अधिकार जिल्हाधिकार्यांना देणारी तरतूद स्थगित ठेवण्यात आली आहे. वक्फ मंडळावरील बिगर मुस्लिम सदस्यांच्या संख्येवरही सर्वोच्च न्यायालयाने मर्यादा घातली आहे. या दोन तरतुदींना केवळ राजकीय पक्षांनीच नव्हे; तर धार्मिक संस्था-संघटनांनी विरोध दर्शवला होता. वक्फ मालमत्तेचे सरकारी मालमत्तेत रूपांतर करण्याच्या तरतुदीच्या अंमलबाजवणीसही न्यायलयने स्थगिती दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाचा आदेश जाहीर होताच सत्ताधारी भारतीय जनता पक्ष व विरोधी पक्षांनीही आपला विजय झाल्याच्या आरोळ्या देण्यास सुरुवात केली. ज्या तरतुदी 'सकृद्दर्शनी मनमानी' (आर्बिट्ररी) दिसत आहेत, त्यांना न्यायालयाने स्थगिती दिली आहे.हे सत्ताधार्यांनी लक्षात घेतले पाहिजे. तसेच संपूर्ण कायद्याच्या अंमलबजावणीस स्थगिती दिलेली नाही, हे कायद्यास आव्हान देणार्यांनी समजून घेतले पाहिजे.




समतोल साधण्याचा प्रयत्न

इस्लामी कायद्यानुसार 'वक्फ' म्हणजे धर्मादाय दिलेली देणगी. शाळा, दफन संस्कारासाठी किंवा धर्मादाय रुग्णालय चालवण्यासाठी मुस्लिम व्यक्ती आपली जमीन किंवा इमारत देणगी देते, त्यास वक्फ म्हटले जाते. वक्फ तयार करणार्या व्यक्तीस 'वाकिफ' म्हटले जाते. वक्फच्या व्यवस्थापनासाठी १९९५ मध्ये कायदा करण्यात आला. त्या नुसार केंद्रीय वक्फ समिती व राज्य पातळीवर वक्फ मंडळे स्थापन करण्यात आली. वक्फ मालमत्तांचे योग्य व्यवस्थापन या समितीने व मंडळाने करावे असे त्यात अपेक्षित आहे. त्यात धर्माचा भाग फारसा नाही. या कायद्यात सुधारणा करणारा कायदा मोदी सरकारने तयार केला. त्याचा मसुदा संयुक्त संसदीय समितीकडे विचार करण्यास पाठवण्यात आला. तिचा अहवाल आल्यानंतर गेल्या ऑगस्टमध्ये तो संसदेने संमत केला. त्याच्या विरोधात ज्या हरकती मांडण्यात आल्या त्या संयुक्त समितीने स्वीकारल्या नाहीत असे अनेक विरोधी पक्षांचे म्हणणे आहे. मुख्य आक्षेप जिल्हाधिकार्यांकडे अनियंत्रित अधिकार देण्यावर होता.'वक्फ' मालमत्ता सरकारी जमीन/मालमत्ता असल्याचा निर्वाळा जिल्हाधिकार्याने दिल्यास, न्यायालयाने निर्णाय देण्यापूर्वीच, त्या मालमत्तेचे स्वरूप लगेच बदलले जाण्याची तरतूद या कायद्यात आहे. ही तरतूद 'अधिकारांच्या विलगीकरणाच्या तत्त्वाचा' भंग करणारी आहे असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले आहे. जी व्यक्ती सलग पाच वर्षे इस्लामचे आचरण करत आहे तीच व्यक्ती वक्फ तयार करू शकते याही तरतुदीस स्थगिती देण्यात आली आहे. केंद्रीय वक्फ समितीत बिगर मुस्लिम सदस्यांची संख्या चार पेक्षा जास्त असू नये, राज्य मंडळावर ती तीनपेक्षा जास्त असू नये, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. देशात वक्फ मंडळ हे सर्वांत मोठे बिगर सरकारी जमीनधारक आहे असा सरकारचा म्हणजेच भाजपचा दावा आहे. संरक्षण खात्याच्या ताब्यात सर्वांत जास्त जमीन आहे, त्यानंतर रेल्वेचा क्रमांक आहे. वक्फच्या जमिनीवर डोळा ठेवून हा कायदा आणल्याचा मुख्य आक्षेप आहे. समिती किंवा मंडळांवर बहुसंख्याकांचे वर्चस्व निर्माण करण्याचा हेतूही त्यात असू शकतो. जिल्हाधिकारी हा सरकारचा प्रतिनिधी असतो; त्याने निर्णय दिल्यास ती जमीन सरकारी होणे ही तरतूद बघता त्यात तथ्य जाणवते. 'सर्वांच्या हितांचे रक्षण करणे व समतेचा समतोल साधणे' या उद्देशाने हा हंगामी आदेश दिल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. कायदा तयार करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाचा असल्याने न्यायालयाने कायद्यास स्थगिती दिलेली नाही. मात्र ज्या तरतुदी वादग्रस्त आहेत त्या स्थगित ठेवून कायद्यातील उणिवा न्यायालयाने सूचित केल्या हे महत्त्वाचे आहे.

## स्वस्थ त्वचेकरता काय खावे? डॉक्टर टीप्स



**ग्रीन टी–**

जेव्हा मोठया प्रमाणात स्वास्थ्य लाभ हवा असेल आणि तो कशानी मिळेल असा जर कुणी प्रश्न केला तर सर्वात वरच्या क्रमांकावर ग्रीन टीचे नाव येईल. ग्रीन टी तुम्हाला सुंदर बनवते. कॅंसर पासुन दुर ठेवते शिवाय तुमच्या त्वचेला स्वच्छ देखील ठेवते आणि तुमच्या चेहे-याला लागणा-या आवश्यक तत्वांनाही पुर्ण करते. जे लोक सतत ३ महिने ग्रीन टी चे सेवन करतात त्यांची त्वचा ग्रीन टी चे सेवन न करणा-यांच्या तुलनेत जास्त मुलायम स्वस्थ आणि कोमल असते. आणि हे सर्व याकरता होतं कारण यात महत्वपुर्ण तत्व जसे कैटेचीन, एत्रछउत्र असतात जे आपल्या शरीरात ऑक्सीजनच्या प्रवाहाला वाढवतात आणि त्वचेत रक्ताच्या कमतरतेला भरून काढतात.

**(क्रमश. )**

## विनोद

राज्याची गोष्ट सोडा, जर आमच्या पक्षाचा खेळाडू निवडला नाही तर तुम्हाला दाखवतो...!



बगारामला एकदा एका जुन्या पडक्या इमारतीत रात्र घालविण्याचा प्रसंग आला. वॉचमनला बगारामने विचारले, काय रे बाबा, इथे या खोलीत काही विशेष घटना घडली आहे का ? गेल्या २५ वर्षात तरी नाही घडलेली वॉचमन म्हणाला, म्हणजे २५ वर्षांपुर्वी काय विशेष घडले होते ? बगारामने उत्सुकतेने विचारले. वॉचमन म्हणाला, २५ वर्षापूर्वी एक माणूस इथे याच खोलीत रात्रभर राहिला आणि सुखरुप घरी निघून गेला होता.

## संदेश

Pappu: Papa ghar mein mehmaan aae hain aur sharabat bnaane ke lie nemboo nahin hai, ab kya karoon?
Santa: abe, darata kyon hai? nae Vim Baar mein 100 neemboo kee shakti hai, daal de 2 boond beta!.

## सुविचार




प्रयास हा प्रतिभेचा प्राणवायू आहे.
– पु.ल. देशपांडे

**संस्कृत सुभाषित**

**काव्यशास्त्र विनोदेन कालो गच्छति धीमताम्।**
**व्यसने च मुर्खाणां निद्रया कलहेन वा।।**

अर्थ –बुद्धिमान लोकांचा वेळ काव्य, शास्त्र, विनोदात (विद्याप्राप्ती करण्यात, चिंतन करण्यात, चांगल्या चर्चा करण्यात आदी) व्यतीत होतो, तर व्यसनात, झोपेत किंवा भांडणात मुर्खांचा वेळ जातो.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. उथळ पाण्याचा आवाज
४. नीच, पापी, दुष्ट
७. विश्रांती
१०. मळलेला
११. उफाड्याचा (बांधा)
१३. प्रामाणिक
१५. अवास्तव
१६. मिठी
१७. गावबाहेरची वस्ती
१९. तालासुराची गट्टी
२०. खाली पडू न देता, नेहमी
२१. चेहऱ्यावरील तेज
२३. प्रफुल्लित
२६. बारा वर्षांचा काळ
२८. लहान
२९. पाणकोंबडा
३०. दिखाऊ, खोलवर नसलेले
३३. चाणक्यकालीन तक्षशिला बरोबरचे एक विद्यापीठ
३५. रहस्य
३७. लोखंड घासण्याचे साधन
३९. फिरणे, चक्कर येणे
४२. अपमान
४३. लक्ष्मीचे एक नाव
४५. युवराज
४६. एकरूप
४८. बडबड
५०. चंद्र
५३. प्रश्न
५५. नवीन आलेला
५७. मृत्यू नसलेला
५८. जंगली
६०. निकट
६१. अनुमती
६३. फणसाचा एक प्रकार
६५. पाप
६८. वितरण
७०. दोन महान ग्रंथ
७२. मगज
७३. उद्याच्या नंतरचा दिवस
७४. कणीदार
७५. मोठी बहीण
७६. विठ्ठलाची पत्नी
७७. नाराजी

## उभे शब्द

१. ताकीद देणे, समज देणे
२. खंड
३. ताणलेल्या दोरीचा आवाज
४. तानाजीला मिळालेली पदवी
५. हिंमत
६. कपाळभर लावलेले कुंकू
७. कहाणीतील गाव
८. दीर्घ उच्चराने नरम
९. भ्रम
१४. नवरदेव
१५. इंद्रिय
१८. जरा उणीच!
२२. वेदना
२४. व्रत,२५. पूजेचे नक्षीदार ताट
२५अ. जहाज लुटणारे
२७. खाट, बाज
३०. सिंह, जगलाचा राजा
३१. आवड
३२. रमापती
३४. दरवाजा
३६. सापाची एक जात
३८. नीच, दुष्ट
४०. नामघोष
४१. भारुड काव्य प्रकारात रचना केलेले संत,४२. अवस
४४. मानी स्त्री
४५. राजाची पत्नी
४६. षष्ठीची देवता
४७. पावसाची धार
४८. देश, जमीन
४९. अरण्य
५१. आगबोट
५२. द्वाड, खोडकर
५३. युद्ध
५४. एक सुगंधी वनस्पती
५६. धुसफूस, त्रास
५७. पुष्कळ, खूप
५८. संतापी
५९. समीक्षा
६२. बाजेची कापडी पट्टी
६४. मर्यादा, सीमा
६५. विजार
६६. पंकज
६७. छोटे जाजम
६९. केशरी गराचे स्वस्त फळ
७१. कधी खरे, कधी खोटे ठरणारे!
७२. मासा पकडण्याचे साधन

## आडवे उत्तरे


१.खळखळाट ४.नराधम ७.आराम १०.मळकट ११.उभार १३.साव १५.अवाजवी १६.कव १७.पाडा १९.साम २०.वरचेवर २१.रया २३.टवटवीत २६.तप २८.सान २९.बदक ३०.वरवरचे ३३.नालंदा ३५.गमक ३७.कानस ३९.गरगरणे ४२.अवहेलना ४३.रमा ४५.राजकुमार ४६.समरस ४८.वटवट ५०.रजनीनाथ ५३.समस्या ५५.नवागत ५७.अमर ५८.रानटी ६०.जवळ ६१.परवानगी ६३.कापा ६५.पातक ६८.वाटप ७०.रामायण महाभारत ७२.गर ७३.परवा ७४.रबाळ ७५.ताई ७६.रखमाई ७७.इतराजी

## उभे उत्तरे

१.खडसावणे २.बळ ३.तलवार ४.नरवीर ५.धमक ६.मळवट ७.आटपाटनगर ८.मग ९.करमणूक १२.भास १४.वर १५.अवयव १८.डावी २२.यातना २४.वसा २५.तबक २५अ.चाचे २७.पलंग ३०.वनराज ३१.रस ३२.रमावर ३४.दार ३६.मणेर ३८.हलकट ४०.गजर ४१.एकनाथ ४२.अमावस्या ४४.मानिनी ४५.राणी ४६.सटवाई ४७.सर ४८.वतन ४९.वन ५१.जहाज ५२.नाठाळ ५३.समर ५४.मरवा ५६.तणतण ५७.अपरंपार ५८.रागीट ५९.टीका ६२.नवार ६४.पारावार ६५.पायजामा ६६.कमळ ६७.सतरंजी ६९.पपई ७१.भाकीत ७२.गळ



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त



### मिथुन मन्हास बनू शकतात बीसीसीआयचे नवे अध्यक्ष

नवी दिल्ली: भारताचे माजी क्रिकेटपटू मिथुन मन्हास यांची बीसीसीआयच्या (इउउख) पुढील अध्यक्षपदी निवड होण्याची शक्यता आहे. दिल्लीत झालेल्या एका महत्त्वाच्या बैठकीत त्यांच्या नावावर एकमत झाल्याचे वृत्त आहे. बीसीसीआयच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत (-ऋच्) त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे, जी २८ सप्टेंबर रोजी होणार आहे.

कोण आहेत मिथुन मनहास?

घरगुती क्रिकेटमधील अनुभव: मिथुन मनहास हे देशांतर्गत क्रिकेटमधील एक मोठे नाव आहे. त्यांनी दिल्ली संघाचे अनेक वर्षे प्रतिनिधित्व केले आणि कर्णधारपदही भूषवले. ते दिल्लीच्या २००७-०८ च्या रणजी विजेत्या संघाचे सदस्य होते.

आंतरराष्ट्रीय संधी नाही: देशांतर्गत क्रिकेटमध्ये उत्कृष्ट कामगिरी करूनही त्यांना कधीही भारतीय संघात स्थान मिळाले नाही, परंतु त्यांच्या अनुभवामुळे ते प्रशासकीय भूमिकेसाठी योग्य मानले जात आहेत.

प्रशासकीय अनुभव: जम्मू आणि काश्मीर क्रिकेट असोसिएशनमध्ये (गघउ-) क्रिकेट ऑपरेशन्स संचालक म्हणून काम केल्यामुळे त्यांना प्रशासनाचा अनुभव आहे.

निवड का झाली?

रॉजर बिन्नी यांनी वयाच्या ७० व्या वर्षी नियमानुसार पद सोडल्यामुळे अध्यक्षपद रिक्त झाले होते. बीसीसीआयची गेल्या काही वर्षांपासून माजी क्रिकेटपटूंनाच अध्यक्षपद देण्याची परंपरा आहे. सौरव गांगुली आणि रॉजर बिन्नी यांच्यानंतर मनहास हे तिसरे क्रिकेटपटू असतील जे या पदावर विराजमान होतील. त्यांच्याकडे खेळाडू आणि प्रशासक अशा दोन्ही भूमिकांचा अनुभव असल्याने त्यांची निवड निश्चित मानली जात आहे.

### पीसीबी अध्यक्ष मोहसीन नक्की यांच्यावर आली पळ काढण्याची

दुबई : आशिया चषक स्पर्धेतील साखळी फेरीतील फर्स्ट क्लास



कामगिरीनंतर भारतीय संघ सुपर ४ मध्ये पुन्हा एकदा पाकिस्तान विरुद्ध भिडले. दुबईच्या आंतरराष्ट्रीय मैदानातील हायहोल्टेज लढतीआधी भारतीय संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव याने प्रसारमाध्यमांशी संवाद साधत सामन्यातील रणनितीसह अनेक मुद्यावर बोलला. मात्र पाकिस्तानचा संघाकडून कुणीच पत्रकार परिषदेला हजेरी लावल्याचे दिसले नाही. पाकिस्तान क्रिकेट संघाने पत्रकार परिषद का टाळली? या मुद्यावर पाकिस्तान क्रिकेट बोर्ड अन् आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष मोहसीन नक्की यांना प्रश्न विचारण्यात आला होता. पाक संघ पत्रकार परिषदेपासून दूर का राहिला हे जाणून घेण्यासाठी काही प्रसारमाध्यमांतील प्रतिनिधींनी नक्की यांचा पाठलाग करत याचा पाठपुरावा करण्याचा प्रयत्न केला. पण याचं उत्तर देण्याऐवजी झउइ अध्यक्षांनी पळ काढल्याचे दिसून आले. यांच्यातील सामन्याआधी नक्की यांनी लवकरच बोलू यावर म्हणत उडवा उडवीचं उत्तर देत निघून गेले. त्यांचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसतो. आशिया चषक स्पर्धेतील भारत-पाकिस्तान यांच्यातील सामन्या संदर्भात देशभरातून तिखट प्रतिक्रिया उमटल्या. देशवासियांची भावना लक्षात घेत या स्पर्धेत ठरल्याप्रमाणे पाकिस्तान विरुद्ध खेळताना भारतीय संघाने प्रतिस्पर्धी पाक संघातील खेळाडूंसोबत हस्तांदोलन करणं टाळलं. हा मुद्दा चांगलाच गाजला. त्यानंतर युएईविरुद्धच्या सामन्यानंतर पाकिस्तान संघाने पत्रकार परिषेद रद्द केली होती. एवढेच नाही तर युएईविरुद्धच्या सामन्याची वेळ झाली तरी खेळावं की नाही, यावर पीसीबी अध्यक्ष अन् पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे माजी अध्यक्ष यांच्यात चर्चा रंगल्याचे पाहायला मिळाले.

# भारताच्या युवा संघाचा विक्रमी विजय ऑस्ट्रेलियाचा ७ विकेट्सने पराभव

## तीन एकदिवसीय मालिकेत भारताची १-० ने आघाडी

नवी दिल्ली : भारत १९ वर्षांखालील संघ आणि ऑस्ट्रेलिया १९ वर्षांखालील संघ यांच्यात तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाचा ७ विकेट्सने पराभव केला आहे. या विजयासह, भारतीय १९ वर्षांखालील संघाने मालिकेत १-० अशी आघाडी मिळवली आहे. भारतीय १९ वर्षांखालील संघ ऑस्ट्रेलियात तीन एकदिवसीय सामने आणि दोन युवा कसोटी सामने खेळणार आहेत. या दौऱ्याची सुरुवात एकदिवसीय मालिकेने झाली आहे.

ब्रिस्बेनमध्ये खेळवण्यात आलेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात, ऑस्ट्रेलिया १९ वर्षांखालील संघाकडून नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेण्यात आला. ऑस्ट्रेलियाची सुरुवात फारशी चांगली झाली नाही. ऑस्ट्रेलियाने आपले दोन्ही सलामीवीर फक्त १ धावा स्कोअर बोर्डवर असताना गमावले. ॲलेक्स टर्नर (०) आणि सायमन बज (०) ० धावांवर माघारी गेले. त्यानंतर स्टीव्हन होगन आणि विल मलाजचुक यांनी ३३ धावांची भागीदारी करत डाव सांभाळला.

मात्र, विल मलाजचुक जास्त काळ मैदानावर तग धरू शकला नाही. तो १७ धावांवर असताना माघारी गेला. त्यानंतर यश देशमुख ३५ धावांवर बाद झाला. ऑस्ट्रेलियाने फक्त ३५ धावांवर आपल्या चार विकेट गमावल्या. त्यानंतर टॉम होगन आणि स्टीव्हन होगन यांनी अर्धशतकी भागीदारी रचत ऑस्ट्रेलिया डाव सावरला. स्टीवन देखील ३९ धावा काढून बाद झाला. त्यानंतर टॉमने ४१ धावांची खेळी करून माघारी परतला. त्यानंतर आर्यन शर्मा १९ धावा काढून बाद झाला. त्यानंतर जॉन जेम्सने नाबाद ७७ धावांची खेळी साकारत ऑस्ट्रेलियाची धावसंख्या २०० च्या पार नेण्यात यश मिळवले. बेन गॉर्डननेही १६ धावा केल्या. जॉन जेम्सच्या खेळीमुळे ऑस्ट्रेलिया अंडर-१९ संघ २२५ धावांपर्यंत मजल मारू शकला. भारताकडून गोलंदाजीमध्ये हेनिल पटेलने तीन, किशन कुमारने दोन आणि कनिष्क चौहानने दोन बळी टिपले आणि यजमान संघाला ९



बाद २२५ धावांवर रोखले. भारतीय गोलंदाजांमध्ये हेनिल पटेलने शानदार कामगिरी केली. त्याने ३ बळी घेतले. किशन कुमार आणि कनिष्क चौहान यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. आरएस अम्ब्रिसला एक यश मिळाले.ऑस्ट्रेलियाच्या धावसंख्येचा पाठलाग करताना, वैभव सूर्यवंशी आणि कर्णधार आयुष म्हात्रे यांच्या जोडीने भारतीय डावाची सुरुवात दमदार केली. वैभव आणि कर्णधाराने ऑस्ट्रेलियन गोलंदाजांना फटकारले. त्यांनी मिळून फक्त चार षटकांत ४५ धावा फटकावल्या.

वैभव सूर्यवंशीने तिसऱ्या षटकात तीन शानदार चौकार मारले. त्यानंतर, चौथ्या षटकात, त्याने एका षटकारासह सलग तीन चौकार मारून ऑस्ट्रेलियन संघाला धक्का दिला. चौथ्या षटकाच्या अखेरीस, वैभवने फक्त २२ चेंडूत ३८ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज हेडन शिलर पुढचा षटक टाकण्यासाठी आला, पाचव्या षटकात वैभवने धावांची भरभराट करण्याचे लक्ष्य ठेवले होते, परंतु नियतीच्या मनात वेगळेच नियोजन होते. कर्णधार आयुषने षटकातील पहिल्या पाच चेंडूंचा सामना केला, नंतर वैभवला स्ट्राईक सोपवला. शेवटच्या चेंडूवर हेडन शिलरने एक शानदार चेंडू टाकला आणि वैभव सूर्यवंशीला पॅव्हेलियनमध्ये पाठवले. अशा प्रकारे, स्टार फलंदाजाची स्फोटक धावसंख्या संपुष्टात आली. त्यानंतर आयुष म्हात्रे ६ धावांकरून बाद झाला. विहान मल्होत्राही ९ धावांवर झटपट माघारी परतला.

वेदांत, अभिज्ञान स्फोटक फलंदाजी वेदांतने ६९ चेंडूंचा सामना करत नाबाद ६१ धावांची खेळी केली. यामध्ये त्याने ८ चौकार लगावले. तर अभिज्ञानने ७४ चेंडूंचा सामना करत नाबाद ८७ धावा चोपल्या. यामध्ये त्याने ८ चौकार आणि ५ षटकारांची आतिषबाजी केली आणि संघाला सामना जिंकून दिला. या विजयासह भारताने मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. ऑस्ट्रेलियाकडून चार्ल्स लॅचमुंडने सर्वाधिक २ विकेट घेतल्या आणि हेडन सिलचरने १ विकेट घेतली.वैभव सूर्यवंशीचा तडाखा १४ वर्षीय वैभवने २२ चेंडूत ७ चौकार आणि १ षटकार मारत ३८ धावांची जलद खेळी केली. त्याचा स्ट्राईक रेट १७२.७३ होता. त्याने फक्त २४ मिनिटे क्रीजवर घालवली, परंतु त्याच्या स्फोटक फलंदाजीने त्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. पहिल्या सामन्यात वैभवची फलंदाजी प्रभावी नसली तरी, त्याच्याकडे अजूनही त्याची प्रतिभा दाखविण्याची उत्तम संधी आहे. एकदिवसीय मालिकेतील पुढील दोन सामन्यांमध्ये त्याला मोठी धावसंख्या उभारण्याची उत्तम संधी असेल.

## ऋषभच्या पुनरागमनाची प्रतीक्षा वाढणार ?

मुंबई : टीम इंडियामध्ये ऋषभ पंतच्या पुनरागमनाची प्रतीक्षा वाढली आहे. डावखुरा यष्टीरक्षक-फलंदाज ऋषभ पंत इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेदरम्यान पायाला फ्रॅक्चर झाला होता, ज्यामुळे तो तीन ते चार आठवडे क्रिकेटपासून दूर राहिला.ऋषभ पंतला दहा सामने खेळता येणार नाही. यामध्ये वेस्ट इंडिजविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांचा तसेच ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर खेळल्या जाणाऱ्या व्हाईट-बॉल मालिकेतील आठ सामन्यांचा समावेश आहे, ज्यामध्ये पाच टी-२० आणि तीन एकदिवसीय सामने आहेत. पंत अद्याप १००% तंदुरुस्त नाही आणि परिणामी, त्याची वेस्ट इंडिज किंवा ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेसाठी निवड होण्याची शक्यता नाही.

भारत २ ऑक्टोबर ते १४ ऑक्टोबर दरम्यान वेस्ट इंडिजविरुद्ध दोन कसोटी सामने खेळणार आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धची पांढऱ्या चेंडूची मालिका १९ ऑक्टोबरपासून सुरू होईल आणि ८ नोव्हेंबर रोजी संपेल. दोन्ही मालिकांसाठी पंतची उपलब्धता अनिश्चित असल्याचे माहिती समोर आली आहे. हाती आलेल्या




वृत्तानुसार, त्याच्या पायाची सूज अद्याप कमी झालेली नाही. त्याला त्याचे वॉकिंग बूट काढण्यासाठीही काही वेळ हवा आहे. कसोटी मालिका १४ नोव्हेंबरपासून सुरू

वेस्ट इंडिज आणि ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेतील १० सामने आता पंतला मुकावे लागणार असल्याने, तो कधी पुनरागमन करणार हे सांगता येत नाही. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील कसोटी मालिका १४ नोव्हेंबरपासून सुरू होत आहे. दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना ईडन गार्डन्स येथे खेळला जाईल, तर दुसरा कसोटी सामना २२ नोव्हेंबरपासून गुवाहाटी येथे खेळला जाईल. कसोटी सामन्यांनंतर, तीन एकदिवसीय आणि पाच टी-२० सामन्यांची मालिका होईल. एकदिवसीय मालिका ३० नोव्हेंबर ते ६ डिसेंबर दरम्यान खेळवली जाईल, तर पाच टी-२० सामन्यांची मालिका ९ डिसेंबर ते १९ डिसेंबर दरम्यान खेळवली जाईल.

## कधी सुधारणार पाकिस्तान? हे पाहून आल्याशिवाय राहणार नाही

दुबई: आशिया कप २०२५ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सुपर-४ च्या सामन्यात पाकिस्तानचा सलामीवीर साहिबजादा फरहानने केलेल्या एका कृतीमुळे नवा वाद निर्माण झाला आहे. फरहानने शानदार अर्धशतक झळकावल्यानंतर बॅटने 'गन सेलिब्रेशन' करत भारताला डिवचले. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला असून, भारतीय चाहते संतापले आहेत.

नेमके काय घडले?पाकिस्तानच्या डावाच्या १० व्या षटकात फिरकीपटू अक्षर पटेल गोलंदाजी करत असताना फरहानने एक जोरदार षटकार मारून आपले अर्धशतक पूर्ण केले. त्यानंतर त्याने बॅट हातात घेऊन ती बंदुकीसारखी करून हवेत गोळीबार करत असल्याचा अभिनय केला. त्याचे हे सेलिब्रेशन तातडीने कॅमेऱ्यात कैद झाले आणि त्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात शेअर केला जाऊ लागला.भारतीय चाहत्यांचा संताप:फरहानच्या या सेलिब्रेशनवर भारतीय चाहत्यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. सोशल मीडियावर अनेकांनी त्याच्या या कृतीला 'अतिरेक्यांसारखे कृत्य' असे संबोधले आहे. अलीकडेच झालेल्या पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर त्याच्या या कृतीने भारतीय लोकांच्या भावना दुखावल्या आहेत. अनेक चाहत्यांनी सांगितले की, फरहानने केवळ भारतीय संघालाच नाही, तर संपूर्ण देशाला आणि हल्ल्यातील पीडितांना डिवचले आहे.मैदानावरील कामगिरी:या वादग्रस्त सेलिब्रेशनपूर्वी फरहानने मैदानावर चांगली कामगिरी केली. त्याला भारताच्या अभिषेक शर्माने दोन वेळा जीवदान दिले. त्याचा फायदा घेत त्याने ४५ चेंडूंमध्ये ५८ धावांची शानदार खेळी केली. यामध्ये ५ चौकार आणि ३ षटकारांचा समावेश होता. मात्र, त्याचे अर्धशतक पूर्ण झाल्यानंतर केलेल्या या कृत्यामुळे त्याचे कौतुक होण्याऐवजी त्याच्यावर जोरदार टीका होत आहे.

# साहिबजादाची नापाक हरकत! गोळीबाराची क्शन पाहून इरफान पठाण म्हणाले..



**दुबई**:आशिया चषक २०२५ च्या सुपर-४ फेरीत पारंपरिक प्रतिस्पर्धी भारत-पाकिस्तान आमनेसामने आले. या रोमांचक सामन्यात भारताने दमदार खेळ करत ६ विकेट्सने पाकिस्तानवर मात केली. मात्र, सामन्यादरम्यान मैदानावर एका घटनेमुळे वाद निर्माण झाला आहे. पाकिस्तानचा सलामीवीर साहिबजादा फरहानने अर्धशतक ठोकल्यानंतर बॅट हातात घेऊन -घ- ४७ रायफलप्रमाणे गोळीबार करण्याची क्शन केली. त्याचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर झपाट्याने व्हायरल झाला असून भारतीय चाहत्यांनी आणि तज्ज्ञांनी त्याच्यावर जोरदार टीका केली आहे. अनेकांनी या कृतीला नापाक हरकत असे संबोधले आहे. विशेष म्हणजे, जेव्हा फरहानने ही क्शन केली, तेव्हा कॉमेंट्री बॉक्समध्ये भारतीय संघाचा माजी स्टार ऑलराउंडर इरफान पठाण उपस्थित होता. त्यावेळी प्रतिक्रिया देताना पठाण म्हणाला, भारताची फलंदाजी अजून बाकी आहे... भारतीय फलंदाज मैदानात आल्यावर तेही सेलिब्रेशन करतील. भारताच्या विजयासह हा सामना आणखी एका वादग्रस्त घटनेमुळे चर्चेत आला आहे. सोशल मीडियावर भारतीय फॅन्सकडून पाकिस्तानच्या खेळाडूवर जोरदार हल्लाबोल होत आहे.

अभिषेक शर्माने रचला इतिहास, टी२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात जलद ५० षटकार ठोकले!

दुबई: आशिया कप २०२५ च्या भारत-पाकिस्तान सामन्यात भारताचा युवा सलामीवीर अभिषेक शर्मा ने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. त्याने आपल्या तुफानी खेळीत केवळ ३३१ ...पाकिस्तानवर तुटून पडला भारतीय ओपनर

आशिया चषक २०२५च्या सुपर-४ सामन्यात भारताने १७२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग जबरदस्त आत्मविश्वासाने सुरू केला. सलामीला आलेल्या शुभमन गिल आणि अभिषेक शर्माने पाकिस्तानच्या गोलंदाजांवर अक्षरशः धडक मारली. अभिषेक शर्माने पहिल्याच चेंडूवर षटकार ठोकत भारतीय डावाला जोरदार सुरुवात दिली. चौकार-षटकारांच्या फटकारांनी स्टेडियम गजबजून गेले होते. फक्त नऊ षटकांत भारताने शतक पूर्ण करत पाकिस्तानवर वर्चस्व गाजवलं. अभिषेकने केवळ २४ चेंडूत अर्धशतक साकारलं आणि अखेरीस ३९ चेंडूत ७४ धावांची तुफानी खेळी साकारली. त्याच्या डावात ६ चौकार आणि ५ षटकारांचा समावेश होता. त्याच्या आक्रमक फलंदाजीमुळे भारताचा विजय अधिकच सोपा झाला आणि प्रेक्षकांनीही या दमदार खेळीला दाद दिली.भारत-पाकिस्तानचा सामना कसा राहिला?

भारताने पाकिस्तानवर ६ विकेट्सने दणदणीत विजय मिळवला. पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करत भारतासमोर १७२ धावांचं आव्हान ठेवलं होतं. मात्र, भारतीय सलामीवीरांनी आक्रमक सुरुवात देत हे लक्ष्य सहज गाठलं. अभिषेक शर्माने फक्त ३९ चेंडूत ६ चौकार आणि ५ षटकारांसह ७४ धावांची तुफानी खेळी केली. तर शुभमन गिलने ४७ धावांचे महत्त्वपूर्ण योगदान दिलं. या जोडीने १०५ धावांची भागीदारी करीत विजयाचा पाया भक्कम केला. त्यानंतर संजू सॅमसन आणि तिलक वर्माने विजयी सोपस्कार पूर्ण करत भारताला सहज विजय मिळवून दिला. पाकिस्तानकडून साहिबजादा फरहानने ५८ धावांची सर्वाधिक खेळी केली. तर फखर जमान (१५), सईम अयुब (२१), मोहम्मद नवाज (२१), सलमान आगा (१७) आणि फहीम अश्रफ (२०) यांनी छोटेखानी योगदान दिलं. भारताच्या गोलंदाजीत शिवम दुबेने दोन गडी बाद केले, तर हार्दिक पांड्या आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी एक-एक विकेट घेतली.

## कोकळगाव येथे स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान




**निलंगा/प्रतिनिधी :** महिलांचे आरोग्य सुदृढ असले तरच कुटुंब आणि समाजाची आरोग्यदृष्टी देखील बळकट राहील, या उद्देशाने २० सप्टेंबर रोजी आयुष्मान आरोग्य मंदिर उपकेंद्र कोकळगाव येथे स्वस्थ नारी, सशक्त परिवार हे विशेष अभियान राबवले गेले. यामध्ये १०७ मुली व महिला यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

या शिबिराचा शुभारंभ पत्रकार श्री.द्रोणाचार्य कोळी यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सहशिक्षिका श्रीमती.वंदना कांबळे उपस्थित होत्या. तर सदर शिबिर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रदीपकुमार जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आले. शिबिरास मार्गदर्शन वैद्यकीय अधिकारी डॉ.रोहिणी जाधव व आरोग्य निरीक्षक श्री.ओमप्रकाश भोजने तसेच आरोग्य सहायिका श्रीमती.शबाना शेख यांनी केलं. सदर शिबिर यशस्वीतेसाठी समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.अभिजीत रूमणे, आरोग्य कर्मचारी श्री.राहुल भोसले, श्री.जयपाल रुपनर, प्रयोगशाळा तंत्रज्ञ श्री.करण सरवदे, आरोग्यसेविका श्रीमती.सी.के जाधव व सर्व आशा स्वंयसेविका, अंगणवाडी सेविका, मदतनीस यांनी विशेष परिश्रम घेतले.

या शिबिरांमध्ये विविध आरोग्य सेवा पुरवल्या गेल्या आहेत. यामध्ये महिलांचे उच्च रक्तदाब आणि मधुमेहाच्या निदानासाठी तपासणी, तोंडाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाच्या निदानासाठीची तपासणी केली. जोखीम असलेल्या महिलांसाठी क्षयरोग तपासणी, किशोरवयीन मुली आणि महिलांसाठी ॲनिमिया (रक्तक्षय) तपासणी आणि समुपदेशन केले गेले. गर्भवती महिलांसाठी प्रसूतिपूर्व काळजी तपासणी व समुपदेशन, हिमोग्लोबिन तपासणी, तसेच पोषण आणि काळजी यावर समुपदेशन आणि बालकांचे आवश्यकतेनुसार लसीकरण पुढील काळात करण्यात येणार आहे. आयुष सेवांच्या अंतर्गत आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, युनानी, सिध्द व नॅचरोपॅथी इत्यादी पर्यायी उपचार पध्दतींची सेवा गरजू रुग्णांना उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

## महाराष्ट्र महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उद्‌घाटन



**निलंगा/प्रतिनिधी :**मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त महाराष्ट्र महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व उद्घाटक संत तुकोबाराय साहित्य परिषदेचे प्रदेश प्रवक्ते सतिष हानेगावे हे होते. या प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या मराठवाडा मुक्ती संग्रामातील योगदानाची माहिती दिली. तरुणांचे मनोबल वाढविण्यासाठी आर्य समाजाने केलेल्या कार्याचा उल्लेखही त्यांनी केला. तसेच महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व महाराष्ट्र शिक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या कार्याचा आढावा घेऊन त्यांनी सांगितले की, शिक्षणाच्या संधी निलंगा येथे उपलब्ध नसल्याने त्यांना गुलबर्गा, हैद्राबाद आणि नागपूर येथे शिक्षण घ्यावे लागले. त्याच नैतिक जाणीवेने त्यांनी महाराष्ट्र शिक्षण समितीची स्थापना करून निलंगा तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी प्राथमिक ते उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. या परंपरेला महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष विजय शिवाजीराव पाटील पुढे नेत असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेची वाटचाल अत्यंत चांगल्या प्रकारे सुरु आहे, असेही हानेगावे यांनी नमूद केले.कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामातील हुतात्म्यांना अभिवादन करुन स्पर्धा परीक्षा केंद्राची आवश्यकता प्रतिपादन केली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच स्पर्धा परीक्षेची तयारी झाली पाहिजे या उद्देशाने या केंद्राची स्थापना करत असल्याचे सांगितले. या कार्यक्रमास संस्थेचे समन्वयक दिलीपराव धुमाळ यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य प्रशांत गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीकृष्ण दिवे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार अभिजीत गोसावी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने दक्षता: आमची सामायिक जबाबदारी विषयावर दक्षता चर्चासत्र उत्साहात संपन्न

**सोलापूर/प्रतिनिधी :** दक्षता जागरूकता सप्ताह २०२५ हा भारतीय रेल्वेमध्ये २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत साजरा केला जाईल. या अनुषंगाने, मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने १८ सप्टेंबर २०२५ रोजी दक्षता विभाग, मुख्यालय, मध्य रेल्वे, मुंबई यांच्या सहकार्याने दक्षता: आमची सामायिक जबाबदारी या विषयावर दक्षता चर्चासत्राचे आयोजन केले होते.

या मेळाव्याला संबोधित करताना, मध्य रेल्वेचे वरिष्ठ उपमहाव्यवस्थापक श्री नीरज कुमार दोहरे यांनी वैयक्तिक आणि व्यावसायिक सचोटी राखणे, नियमांचे पालन करणे आणि पारदर्शकतेची वचनबद्धता राखण्याचे महत्त्व अधोरेखित केले. दैनंदिन कामकाजात दक्षता सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक असलेल्या विविध रेल्वे कोड आणि पद्धतींबद्दल त्यांनी सहभागींना मार्गदर्शन केले.

या सत्रादरम्यान, उपमुख्य दक्षता अधिकाऱ्यांनी रेल्वेच्या विविध विभागांमधील भ्रष्टाचार रोखण्यासाठी सविस्तर माहिती दिली, केस स्टडीजवर प्रकाश टाकला आणि अधिकाऱ्यांना भ्रष्टाचारमुक्त व सचोटीने चालणारी कार्य संस्कृती स्वीकारण्यास मार्गदर्शन केले. कर्मचाऱ्यांना अधिक सक्रिय करण्यासाठी, रेल्वे आचारसंहितेवर एक प्रश्नमंजुषा स्पर्धा देखील आयोजित करण्यात आली होती. योग्य उत्तरे देणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे कौतुक करण्यात आले आणि त्यांना बक्षिसे देण्यात आली, ज्यामुळे नैतिक मानके राखण्यासाठी ज्ञान आणि जागरूकतेचे महत्त्व अधोरेखित झाले.




या चर्चासत्रात सोलापूर विभागाचे मुख्य प्रकल्प व्यवस्थापक श्री शैलेंद्र सिंह परिहार, मुख्यालय मध्य रेल्वेचे दक्षता विभागाचे वरिष्ठ अधिकारी श्री प्रदीप हिरडे (वाहतूक), श्री चंद्रकांत कदम (लेखा आणि कार्मिक), श्री सुनील कुमार बैरवा (विद्युत) आणि श्री अमित जोशी (स्टोअर्स आणि मेकॅनिकल) उपस्थित होते. मुख्यालय मध्य रेल्वेचे विविध विभागांचे मुख्य दक्षता निरीक्षक, सोलापूर विभागातील सर्व शाखा अधिकारी आणि निरीक्षकांनीही सक्रिय सहभाग घेतला.

सोलापूरचे अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक अंशुमाली कुमार यांनी आभार मानून चर्चासत्राचा समारोप केला. त्यांनी दक्षता विभागाच्या प्रयत्नांचे कौतुक केले आणि सर्व कर्मचाऱ्यांना सामूहिक जबाबदारी म्हणून दक्षता आत्मसात करण्यास प्रोत्साहित केले. या कार्यक्रमाचे समन्वय वरिष्ठ विभागीय वित्त व्यवस्थापक श्री आदित्य त्रिपाठी यांनी केले आणि वरिष्ठ विभागीय कार्मिक अधिकारी श्री मच्छिंद्र घोळवे यांच्या नेतृत्वाखाली कार्मिक विभागाने यशस्वीरित्या आयोजित केले.

अशा उपक्रमांद्वारे, मध्य रेल्वेचा सोलापूर विभाग पारदर्शकता, जबाबदारी आणि भ्रष्टाचारमुक्त रेल्वे व्यवस्था निर्माण करण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार करतो.

## भारतीय ज्ञानप्रणाली जगाच्या पाठीवर सर्वश्रेष्ठ - डॉ.गणेश गोमारे

### दयानंद विज्ञानमध्ये भाषा विभागाच्या वतीने भारतीय ज्ञानप्रणाली विषयांतर्गत आयुर्वेदाची ओळख या विषयावर उद्बोधनपर व्याख्यान



**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय ज्ञानप्रणाली ही जगातील सर्वात प्राचीन आणि व्यापक ज्ञान परंपरापैकी एक महत्त्वाची सर्वश्रेष्ठ परंपरा असून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात या प्रणालीला अनन्यसाधारण असे महत्त्व दिलेले आहे.या भारतीय ज्ञान परंपरेत आस्तिक व नास्तिक ही दोन दर्शने आहेत.तसेच आयुर्वेद,दिनचर्या व ऋतुचर्या यालाही भारतीय ज्ञानप्रणालीत खूप महत्त्व आहे.चरक,सुश्रुत व वाग्भट हे प्राचीन भारतातील प्रसिद्ध आयुर्वेदिक वैद्य आणि ग्रंथकार आहेत. आयुर्वेदावर,भारतीय ज्ञानप्रणालीवर वैज्ञानिक दृष्टिकोनातून जास्तीत जास्त संशोधन करण्याची खरी गरज आज आहे.कारण निरोगी शरीर हीच आपली खरी संपत्ती असून प्रत्येकांनी आरोग्य सांभाळणे ही आजच्या आधुनिक काळाची गरज बनली आहे.त्याचबरोबर आयुर्वेदाचे मुख्य उद्दिष्ट शरीरातील नैसर्गिक संतुलन राखणे,रोगांना प्रतिबंध करणे आणि आरोग्य सुधारणे हे आहे.मानवी शरीरात वात,पित्त आणि कफ हे तीन मुख्य दोष असतात,जे शरीराचे कार्य व आरोग्य नियंत्रित करतात. पंचमहाभूतांपासून शरीर बनले आहे.मधुमेह,दमा आणि संधिवात यासारख्या दीर्घकालीन आजारांवर नियंत्रण मिळविण्यासाठी आयुर्वेद उपयुक्त आहे.पुरेशी झोप,चांगला आहार,व्यायाम,ध्यान व सकारात्मक विचार अशा दिनचर्या व ऋतुचर्यामुळे आरोग्य सुधारते.म्हणूनच आरोग्य सांभाळा आणि निरोगी रहा,असे प्रतिपादन लातूर येथील प्रसिद्ध डॉ. गणेश गोमारे यांनी केले.

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील भाषा विभागाच्या वतीने दि.१९ सप्टेंबर २०२५ रोजी विद्यार्थ्यांसाठी भारतीय ज्ञानप्रणाली विषयांतर्गत आयुर्वेदाची ओळख या विषयावर उद्बोधनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेले होते.या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांचेही सहकार्य लाभले.याप्रसंगी समन्वयक व इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.मेघा पंडित,हिंदी विभाग प्रमुख डॉ.गजानन बने, संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रोहिणी शिंदे,मराठी विभाग प्रमुख डॉ.रामशेट्टी शेटकार यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच महाविद्यालयातील इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि बी.एस्सी.,बीसीएस आणि बायोटेकचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे 'फार्मा ब्रेन्स क्विझ स्पर्धा–२०२५' यशस्वीरीत्या पार पडली



**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद एज्युकेशन सोसायटी संचालित दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लातूर येथे 'फार्मा ब्रेन्स क्विझ स्पर्धा–२०२५' मोठ्या उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने संपन्न झाली. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतांचा विकास, तसेच फार्मसी क्षेत्रातील शैक्षणिक गुणवत्तावृद्धी या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत लातूर परिसरातील विविध फार्मसी महाविद्यालयांतील एकूण १२५ बी. फार्मसी व डी. फार्मसी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. औषधनिर्मितीशास्त्र, औषधशास्त्र, तंत्रज्ञान, तसेच चालू घडामोडींवरील प्रश्नांना विद्यार्थ्यांनी दिलेल्या परखड व रोचक उत्तरांमुळे स्पर्धा अत्यंत रंगतदार झाली. स्पर्धेचे समन्वयक सहाय्यक प्रा. अरुण कोंडापूरे व प्रा. रोहित ऊसनाळे यांनी नियमावली स्पष्ट करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. परीक्षक म्हणून प्रा. कुलदीप पवार यांनी कार्यभार सांभाळला. विजेत्यांची घोषणा दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी 'फार्मासिस्ट डे' निमित्त करण्यात येणार असून सर्व सहभागी विद्यार्थ्यांना ई–सर्टिफिकेट्स प्रदान करण्यात येतील, असे आयोजकांनी सांगितले. या प्रसंगी दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते यांनी या उपक्रमाचे कौतुक व्यक्त केले. तसेच दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस यांनी अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक परीक्षांविषयी आत्मविश्र्वास वाढतो व ज्ञान अधिक दृढ होते, असे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद, कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी यांचे योगदान लक्षणीय ठरले.

# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने स्वच्छता ही सेवा अभियान २०२५ अंतर्गत वॉकेथॉनचे आयोजन केले

**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने १९ सप्टेंबर २०२५ रोजी स्वच्छता ही सेवा अभियान २०२५ अंतर्गत तिसऱ्या दिवशी स्वच्छता आणि जबाबदार कचरा व्यवस्थापनाबद्दल जागरूकता पसरविण्यासाठी वॉकेथॉनचे आयोजन केले होते. वॉकेथॉन सकाळी विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयापासून सुरू झाला आणि सोलापूर रेल्वे स्थानकावर संपला. विभागीय रेल्वे व्यवस्थापक डॉ. सुजीत मिश्रा यांनी सर्व सहभागींना स्वच्छता शपथ (स्वच्छतेची प्रतिज्ञा) दिली आणि रॅलीला हिरवा झेंडा दाखवला.

या कार्यक्रमात विविध विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसह सुमारे १२५ स्वयंसेवकांचा उत्साही सहभाग दिसून आला. अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक/सोलापूर, रेल्वे रुग्णालय सोलापूर चे मुख्य वैद्यकीय अधीक्षक हे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. शाखा अधिकारी आणि इतर कर्मचारी आणि नागरिकांसोबत खांद्याला खांदा लावून चालले. सहाय्यक विभागीय यांत्रिक अभियंता आणि सहाय्यक सुरक्षा आयुक्त यांनी त्यांच्या पथकांसह रॅलीचे प्रभावी नेतृत्व केले.





यावेळी बोलताना, सोलापूरचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक डॉ. सुजीत मिश्रा यांनी रेल्वे कर्मचारी आणि सर्वसामान्यांना श्रमदानात सहभागी होऊन आणि जबाबदारीने कचरा विल्हेवाट लावण्यासाठी कचऱ्याच्या डब्यांचा वापर करण्याची सवय लावून स्वच्छतेत सक्रिय योगदान देण्याचे आवाहन केले. स्वच्छता ही केवळ रेल्वेची जबाबदारी नाही तर समाजाचीही एक सामायिक वचनबद्धता आहे यावर त्यांनी भर दिला.

रेल्वे परिसर आणि आजूबाजूचा परिसर स्वच्छ, हिरवा आणि प्रवाशांसाठी अनुकूल बनवण्यासाठी सामूहिक जबाबदारीचे महत्त्व अधोरेखित करणारा वॉकेथॉन हा जनजागृती कार्यक्रम होता. अशा उपक्रमांद्वारे, सोलापूर विभाग स्वच्छ रेल – स्वच्छ भारत या दृष्टिकोनाला आपले समर्पण दाखवत आहे, ज्यामुळे सर्व प्रवाशांसाठी सुरक्षित, स्वच्छ आणि आनंददायी प्रवास सुनिश्र्चित होतो.

## पानगाव, भातखेडा येथील पशुवैद्यकीय दवाखान्याच्या विकास कामासाठी प्रत्येकी ४३ लाखाचा निधी मंजूर

**लातूर/प्रतिनिधी :** रेणापूर तालुक्यातील पानगाव आणि लातूर तालुक्यातील भातखेडा येथील पशुवैद्यकीय चिकित्सालयाच्या पायाभूत विकास कामासाठी प्रत्येकी ४३ लक्ष याप्रमाणे ८६ लक्ष रुपयाचा निधी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून मंजूर झाला आहे.

शेतकऱ्याकडे असलेले पशुधन टिकले पाहिजे, जगले पाहिजे यासाठी पशुवैद्यकीय चिकित्सालयास सर्व सोयीसुविधा मिळाल्या पाहिजेत असा आग्रह सातत्याने आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांचा राहिला असून त्यांनी केलेल्या प्रयत्नामुळे लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील पानगाव आणि भातखेडा येथील दोन्ही पशुवैद्यकीय चिकित्सालयाच्या पायाभूत विकास कामासाठी प्रत्येकी ४३ लक्ष निधी मंजूर झाला आहे.

सदरील मंजूर निधीतून पानगाव आणि भातखेडा येथील पशुवैद्यकीय चिकित्सालंयात बिगर निवासी नवीन इमारतीचे बांधकाम, विंधन विहीर, पाण्याचा हौद, दवाखान्यातील फर्निचर, विद्युतीकरण आणि सोलार प्लांट बसवण्यात येणार आहेत. यामुळे दिवसा आणि रात्रीही पशुधनावर उपचार होण्यास मदत होणार असून सदरील निधी मंजूर करून दिल्याबद्दल लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांचे पानगाव आणि भातखेडा गावातील आणि परिसरातील भाजपा कार्यकर्त्यांसह शेतकऱ्यांनी आभार व्यक्त केले आहेत.



प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९


# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात हिंदी भाषा पंधरवडा उत्साहात साजरा केला जात आहे

**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात १५ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत हिंदी पंधरवडा मोठ्या उत्साहात आणि सक्रिय सहभागाने साजरा केला जात आहे. यानिमित्ताने कर्मचाऱ्यांमध्ये हिंदीचा वापर करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी विविध स्पर्धा, प्रशिक्षण कार्यक्रम आणि बैठका आयोजित केल्या जात आहेत.

१६ आणि १७ सप्टेंबर २०२५ रोजी, राजभाषा विभागाने विभागीय कार्यालयात हिंदी मसुदा, हिंदी निबंध लेखन, हिंदी भाषण स्पर्धा आणि राजभाषा प्रश्न मंच आयोजित केला होता. त्यानंतर, १८ आणि १९ सप्टेंबर २०२५ रोजी, शाखांमध्ये टेबल प्रशिक्षण घेण्यात आले आणि संगणक वापरकर्त्यांना हिंदी कीइंग आणि व्हॉइस टायपिंगचे प्रशिक्षण देण्यात आले. या क्रमाने, २२ ते ३० सप्टेंबर २०२५ दरम्यान विभागाच्या प्रमुख स्थानकांवर (सोलापूर, कुर्डुवाडी, पंढरपूर, लातूर, कलबुरगि आणि वाडी) असलेल्या डेपो/कार्यालयांमधील कर्मचाऱ्यांसाठी हिंदी सुलेखन आणि अधिकृत भाषा प्रश्न मंच स्पर्धा आयोजित केल्या जात आहेत.

१९ सप्टेंबर २०२५ रोजी, विभागाने हिंदी दिन साजरा केला आणि विभागीय अधिकृत भाषा अंमलबजावणी समिती, सोलापूरची १०२ वी त्रैमासिक बैठक आयोजित केली. ही बैठक विभागीय रेल्वे व्यवस्थापक डॉ. सुजित मिश्रा यांच्या अध्यक्षतेखाली झाली यावेळीअतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक आणि मुख्य अधिकृत भाषा अधिकारी श्री. अंशुमाली कुमार उपस्थित होते.

याप्रसंगी, अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री. अंशुमाली कुमार यांनी मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांचा हिंदी दिन संदेश वाचला आणि विभागीय रेल्वे व्यवस्थापक डॉ. सुजित मिश्रा यांनी विभागाच्या अधिकृत भाषा त्रैमासिक ई-मासिक संदेश चा २१ वा अंक प्रकाशित केला. आपल्या भाषणात, विभागीय रेल्वे व्यवस्थापकांनी सांगितले की, कार्यालयीन कामासाठी हिंदीचा वापर करताना, कठीण शब्द टाळून सोपी, समजण्यासारखी आणि बोलीभाषा असलेली हिंदी वापरली पाहिजे. त्यांनी कर्मचाऱ्यांना प्रेरणा आणि प्रोत्साहन देऊन संघाच्या राजभाषा धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी पूर्ण सहकार्य करण्याचे आवाहन केले.

बैठकीला संबोधित करताना, अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक आणि मुख्य राजभाषा अधिकारी यांनी सांगितले की, आपल्या संविधान सभेने १४ सप्टेंबर १९४९ रोजी देशाची राजभाषा म्हणून हिंदी स्वीकारली. म्हणून, शक्य तितके काम हिंदीमध्ये करणे ही आपली जबाबदारी आहे.




यावेळी अधिकाऱ्यांना फादर कामिल बुल्के यांनी लिहिलेला इंग्रजी-हिंदी शब्दकोश, दैनंदिन वापरासाठी इंग्रजी-हिंदी दिनचर्या नोट्स आणि हिंदी संवादाला प्रोत्साहन देण्यासाठी - तुम्ही हिंदीत बोललात तर मला खूप आनंद होईल असा संदेश असलेला टेबल स्टँड वाटण्यात आला.

सर्व शाखा अधिकारी, इतर अधिकारी, मुख्य कार्यालय अधीक्षक/कार्यालय अधीक्षक आणि विभागीय कार्यालयातील स्टेशन राजभाषा अंमलबजावणी समित्यांचे अध्यक्ष/सदस्य-सचिव बैठकीला उपस्थित होते. बैठकीचे आयोजन करण्यात आले आणि आभार प्रदर्शन श्री. एस.एल. यांनी केले. खोत, सहाय्यक कार्मिक अधिकारी आणि संपर्क अधिकारी, राजभाषा. श्री. व्ही.बी. कडगे (वरिष्ठ अनुवादक), श्री. राजीव वालीवकर (वरिष्ठ अनुवादक), श्री. शिवसाहेब यादव (कनिष्ठ अनुवादक) आणि श्री. किरण माने (कार्यालय सहाय्यक) यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यात विशेष योगदान दिले.

सोलापूर विभागात आयोजित केले जाणारे हे कार्यक्रम राजभाषा हिंदीच्या प्रचारासाठी आणि राजभाषा धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नवीन प्रेरणा आणि दिशा देत आहेत.

# सरकारचा लाडक्या बहिणींना झटका: वय चोरणाऱ्या महिलांचा पत्ता कट

**लातूर/ आयुब बागवान : :** एका कुटुंबातील जास्तीत जास्त दोघींना 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'चा लाभ मिळेल असे स्पष्ट असतानाही काही कुटुंबांतील तिघी चौघी जणींनी नोंदणी केल्याचं निदर्शनास आले आहे. याशिवाय २१ ते ६५ वर्ष वयोगटाची अट असताना काही महिलांनी वयोमर्यादा ओलांडली असल्याचे पडताळणीत आढळले. त्यामुळे लातूर जिल्ह्यातील ४ हजार ८२७ लाडक्या बहिणींचा पत्ता कट झाला आहे.

महिला व मुलींना स्वावलंबी आणि राज्य आत्मनिर्भर बनविण्यासाठी शासनाच्या वतीने गेल्या वर्षी जुलै महिन्यापासून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबवण्यात येत आहे. ऐन विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही योजना सुरू झाल्याने लाभाचे नियम, अटींकडे फारसे लक्ष केंद्रित करण्यात आले नव्हते. त्यामुळे योजनेचा लाभ मिळावा म्हणून काही महिलांनी कुटुंबात चारचाकी असणे, संगांयो, इंगांयो, प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा लाभ घेत असतानाही नोंदणी केल्याचे निदर्शनास आले.

याशिवाय, काही कुटुंबांतील तीन-चार महिलांनी तर काहींनी वय बसत नसतानाही अर्ज केल्याचे उघडकीस आल्याने फेरपडताळणी करण्यात आली. योजनेच्या लाभासाठी जिल्ह्यात ५ लाख ९२ हजार २३१ महिलांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २४ हजार ७७२ प्रस्ताव अपात्र ठरले.

सध्या लातुर जिल्ह्यात ५ लाख ६७ हजार ४५९ लाभार्थी महिला आहेत. शासनाच्या निर्देशानुसार २१ पेक्षा कमी व ६५ पेक्षा जास्त वय असलेल्या संशयित लाभार्थींच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली. त्यात १६१६ महिला अपात्र ठरल्या आहेत.तसेच एकाच कुटुंबातील दोनपेक्षा अधिक महिलांनी लाभ घेतल्याच्या संशयावरून ५५ हजार ०९२ महिलांच्या कागदपत्रांची तपासणी झाली. त्यात ३ हजार २११ महिला अपात्र ठरल्या आहेत.

वयोमर्यादा ६५ तरी महिलांनी घेतला फायदा

किमान २१, तर कमाल वय ६५ वर्षे असणे बंधनकारक आहे, मात्र काहींनी १९, २० वय असतानाही लाभ घेतल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच ६५ वर्षांपेक्षा अधिक वय झालेल्या महिलांचाही लाभार्थी यादीत समावेश असल्याचे प्रत्यक्ष पडताळणीत आढळून आले आहे

## निलंगा परिसरात विजांचा कडकडाट, एका महिलेसह चार जनावरे दगावली

**निलंगा/आयुब बागवान :** निलंगा पासून जवळच असलेल्या मौजे सांगवी-जेवरी ता. निलंगा येथे शनिवारी ता. २० रोजी सायंकाळी



सहाच्या सुमारास वादळी वारे व विजांच्या कडकडाटासह खूप मोठा पाऊस झाला. सांगवी ते दोन ठिकाणी वीज पडून एक महिला व चार जनावरांचा जागीचा मृत्यू झाला. यामध्ये सांगवी पूर्व येथील घराच्या पाठीमागे असलेली म्हैस पावसामुळे घरात आणण्यासाठी अनिता मारुती राठोडे वय ४० वर्षे ही महिला गेली असता तिच्या अंगावर वीज पडून ती दगावली. सोबत म्हैस व त्यांचा पाळीव कुत्रा ही दगावला. याच शिवारात तेरणा नदीच्या बाजूला असलेल्या महादेव भानुदास सरतापे या शेतकऱ्यांची बैलजोडी विज पडून दगावली आहे. घटनास्थळी निलंगा तहसिलचे तहसिलदार प्रसाद कुलकर्णी यानी तात्काळ घटनास्थळी भेट देवून पहाणी केली आहे. तसेच पोलिसांनीही घटनेचा पंचनामा सुरू आहे.

# तळीखेड तालुका निलंगा येथील शेकडो एकर ऊस पिक भुईसपाट

### तात्काळ नुकसान भरपाई द्यावी; तळीखेड येथील शेतकरी बांधवांची मागणी

**निलंगा/आयुब बागवान : :** तालुक्यातील तळीखेड येथील शनिवारी झालेल्या ढगफुटी सदृश पावसाने कहर केला असून तळीखेड परिसरातील शेकडो एकर ऊस संपूर्ण भुईसपाट झाला असल्याने येथील शेतकरी बांधवांचे खूप मोठ्या प्रमाणात झाले असून.मा. तहसीलदार साहेब निलंगा व उपविभागीय अधिकारी निलंगा यांनी तात्काळ या परिसरातील ढगफुटी पावसामुळे लाखो रुपयाचे नुकसान झाले असून उसासोबत संपूर्ण सोयाबीन, तुर, उडीद,मुग हेही पीक हातातून गेली आहेत.



शेतकरी बांधव उसाच्या पिकावर आपल्या कुटुंबाला तसेच इतर काही देवाणघेवाण करून आपला उदरनिर्वाह भागवण्याचे काम करत असतो मात्र कालच्या झालेल्या अति मुसळधार पावसाने संपूर्ण उसाचे क्षेत्र भुई सपाट झाल्यामुळे येथील शेतकरी वर्ग खूप मोठ्या संकटात सापडला असून त्यांना आता खूप मदतीची गरज आहे.

तेरी मेहरबान तहसीलदार साहेब व उपविभागीय अधिकाऱ्यांनी तात्काळ पंचनामे करून मदतीचा हात द्यावा अशी मागणी येथील शेतकरी बांधव श्री मोहन पांचाळ व विश्वनाथ वारद यांनी येथील अधिकाऱ्यांना विनंती करून मागणी केली आहे.

## जनमाता देवस्थान साठी लागेल तेवढा निधी देणार – सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील

**चाकूर/प्रतिनिधी :** तालुक्यातील आई जनमाता देवस्थानसाठी लागेल तेवढा निधी देऊन मंदिराचा विकास घडवून आणणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी चाकूर तालुक्यातील खुर्दळी येथे केले. मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते तालुक्यातील खुर्दळी येथे येथील आई जनमाता देवस्थानची घटस्थापना सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर भाजप नेत्या अर्चनाताई पाटील चाकूरकर, , शिवाजीराव काळे, भानुदासराव पोटे, यशवंतराव जाधव, दयानंदराव सुरवसे, सरपंच प्रचिताताई भोसले, दैनिक सकाळचे पत्रकार



विकास गाढवे, ॲड. संतोष गंभीरे, अनिलराव वाडकर, अशोकराव कर्डिले, संदीप शेटे, संगम जनगावे, ॲड. श्रीनाथ सावंत, विवेकानंद शिंदे, शशिकांत शिंदे, कासिम भाई पटेल, जलीलसाब पटेल, बाबुभाई दिवाणजी, अलीम पटेल, अध्यक्ष शरद पाटील, उपाध्यक्ष ज्ञानोबा जाधव, पांडुरंग शिंदे, अमर पाटील तसेच हाळी खुर्द गावचे सर्व ग्रामस्थ, महिला भगिनी यावेळी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना ना. बाबासाहेब पाटील म्हणाले की, आई जनमाता मंदिराचे महत्व अनादी काळापासून आहे. मतदारसंघाचे प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध असून, मतदारसंघ सुजलाम सुफलाम करण्याची प्रार्थना आई जनमाता कडे करणार असल्याचे सहकार मंत्री ना. पाटील म्हणाले.

### घट स्थापना ..

करता घट स्थापना
आनंद उसळे मना
नऊ दिस भारावले
शक्तीदेवी आराधना

नऊ रूपे महामातेचे
समजून घेवू लक्षणा
पूजा पाठ नित्य नेम
स पत्नीक सुलक्षणा

गृहिणीस ठेवू सुखी
मान देऊ महिलांना
अन्याय ना कुणावर
साम्यता मुलीमुलांना

स्त्रिया मुली सुरक्षीत
विखारी नकोभावना
प्रसन्न होई दुर्गा माता
जळतासरता वासना

शरणजाई अंबाईला
सहकुटूंब रे संरक्षणा
आई बापांना जपता
परिपूर्ण हो प्रदक्षणा

स्त्री भृणहत्या सरावी
सुखे नादाव्या ललना
फुलू द्यावे लतिकांना
पोचेल देवीस वंदना

क्षमस्व जगत् जननी
माणूस मी राही उणा
ओवाळू टाके आयुष्य
उतराई ना तव ऋणा

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

## विभागीय नेहरू हॉकी स्पर्धेत बाभळगाव कॉलेजचा संघ ठरला उपविजेता



बाभळगाव : दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव कनिष्ठ महाविद्यालयाच्या १७ वर्ष वयोगटातील हॉकी संघ उप विजेता ठरला आहे. खालसा हायस्कूल, नांदेड येथे संपन्न झालेल्या विभागीय नेहरू कप हॉकी स्पर्धेत महाविद्यालयाचा संघ विशेष कौशल्याने सर्व द्वितीय ठरला. यावेळी सामन्याच्या पंचांनी महाविद्यालयाच्या संघास उपविजेता म्हणून घोषित केले. या संघामध्ये कप्तान गणेश महादेव चाबुकस्वार, प्रथनेश लक्ष्मण पांचाळ, श्रेयश काशिनाथ कुणशेटे, अथर्व अनिल अवघडे, सौरभ नेताजी मस्के, ओंकार बालाजी गुंठे, श्रेयश बाबासाहेब कांबळे, प्रतिक ज्ञानेश्वर सगर, आदर्श राजेंद्र मस्के, महेश दिलीप गायकवाड, पृथ्वीराज महावीर शेळके, अमित धनाजी कांबळे, बालाजी दिगंबर काळे, वेदांत विनोद गव्हाणे, प्रणव तानाजी मस्के, सुरवसे राम हरी या खेळाडूंचा समावेश होता. महाविद्यालयात एका कार्यक्रमामध्ये त्यांचा सत्कार करण्यात आला. या हॉकी खेळाडूंना प्रा. महारुद्र बिडवे, क्रीडा संचालक डॉ. वैशाली माढेकर, इमाम शेख, साहिल सम दुरले, मंजर शेख, कार्तिक मस्के यांनी मार्गदर्शन केले आहे.

या यशाबद्दल दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव अध्यक्ष मा. आ. धीरज विलासराव देशमुख, सचिव शाम माणिकराव देशमुख, सर्व संचालक मंडळ, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, स्टाफ सचिव प्रा.विवेक कदम, प्रा.चंद्रकांत मोरे, बाळासाहेब देशमुख, प्रा..हरिहर गायके, ग्रंथपाल डॉ.महावीर कटके, प्रा. विवेक गोस्वामी, प्रा. विजय सगर, अंकुश थडकर यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले

# चेअरमन व गट सचिव जिल्हा मध्यवर्ती बँकेचा आत्मा : सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील

**अहमदपूर/प्रतिनिधी :** तालुक्यातील चेअरमन व गट सचिव जिल्हा मध्यवर्ती बँकेचा आत्मा असून त्यांच्यामुळेच विविध सोसायटीची शंभर टक्के वसुली होत असते असे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी अहमदपूर येथे केले.

अहमदपूर येथील दीपवर्षा मंगल कार्यालयात लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विविध सेवा संस्थेची १००% टक्के वसुली करणाऱ्या २९ गटसचिव व चेअरमन यांच्या सन्मान सोहळ्यात बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी चेअरमन महेश पाटील हे होते तर यावेळी प्रमुख पाहुण्यांमध्ये शिवानंद हेंगणे, तालुका अध्यक्ष शिवाजीराव देशमुख, महेश बँकेचे उपाध्यक्ष निवृत्तीराव कांबळे, चेअरमन संग्रामची चामे, राष्ट्रवादी




काँग्रेसचे शहराध्यक्ष अजहरभाई बागवान, गंगाधरराव नागमोडे साहेब, अहमदपूरचे फिल्ड ऑफिसर अतुल देशमुख, शिरूर तालुका चेअरमन तुळशीराम भोसले, ड. मुंढे, राजकुमार सोमवंशी तसेच सर्व सरपंच चेअरमन सेक्रेटरी आणि सोसायटीचे सदस्य यावेळी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना सहकार मंत्री ना. पाटील म्हणाले की मतदारसंघातील चेअरमन कायम हे माझ्यासोबत राहिले आहेत. मतदारसंघात चांगल्या पद्धतीचे राजकारण आपल्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. सर्व चेअरमन यांना समान न्याय देण्याचा प्रयत्न लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून केला आहे.

आपल्या आशीर्वादामुळे मला राज्याचा सहकार मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. . विविध सेवा संस्थेने कर्ज देणे घेणे यापेक्षा पुढे जाऊन आता व्यवसायात उतरला पाहिजे व विविध प्रकल्पाच्या माध्यमातून सोसायट्यांना मजबूत करण्याचं काम चेअरमन व गटसचिव यांनी करावे असे आवाहन सुद्धा सहकार मंत्री ना पाटील यांनी केले.

या वेळी शिवानंद हेंगणे यांनीही मनोगत व्यक्त केले.

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६